शनिवार, २१ ऑक्टोबर २०२३
⊙ किंमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०३ ⊙ अंक - ७७
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

● MARATHI ● DAINIK ● CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) SATURDAY 21 OCT. 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-03 ● ISSUE-77 ● RNI : MAHMAR/2021/82566 ● PAGE-12 ● PRICE-5

# अखेर कंत्राटी भरतीचा जीआर रद्द

## उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांची मोठी घोषणा

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** वादग्रस्त ठरलेला कंत्राटी भरतीचा जीआर रद्द केल्याची घोषणा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली. राज्यात कंत्राटी भरतीचे 100 टक्के पाप हे काँग्रेस, ठाकरे गट आणि शरद पवारांचे आहे, असा आरोप फडणवीस यांनी केला. त्यामुळे हे पाप आपल्या माथी नको, असे सांगत फडणवीस यांनी जीआर रद्द करण्याचा निर्णय जाहीर केला. शिंदे फडणवीस सरकारकडून सुरू असलेल्या कंत्राटी भरतीविरोधात विरोधकांनी रान उठवले आहे. शुक्रवारी देवेंद्र फडणवीसांनी पत्रकार परिषद घेत याला प्रत्युत्तर दिले. कंत्राटी भरतीवरून उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी उद्धव ठाकरे आणि शरद पवारांवर निशाणा साधला आहे.



कंत्राटी भरतीचा पहिला जीआर काँग्रेसने काढला आहे. कंत्राटीकरणाचे पाप काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे आहे. आणि आता त्याविरोधात आंदोलन करत आहे. कंत्राटी भरती काँग्रेस आणि राष्ट्रवादीचे पाप आहे. त्यांच्या पापाचे ओझे आमच्या सरकारने का उचलावे? असा सवाल करत कंत्राटी भर्ती रद्द केल्याची घोषणा देवेंद्र फडणवीसांनी केली आहे. कंत्राटी भरती संदर्भात पहिला जीआर 13 मार्च 2003 रोजी काढण्यात आला. त्यावेळीच्या काँग्रेस आणि शरद पवारांच्या सराकरमध्ये कंत्राटी भरती झाली. 2010 साली अशोक चव्हाणांनी पहिला जीआर काढला. सहा हजार कंत्राटी पदाचा जीआर काढण्यात आला. काँग्रेस आणि शरद पवार यांच्या राष्ट्रवादीच्या काळात कंत्राटी शिक्षण भर्तीचा जीआर काढण्यात आला. 2014 साली पुन्हा पृथ्वीराज चव्हाण मुख्यमंत्री असताना देखील कंत्राटी भर्तीचा जीआर काढण्यात आला. एमसीए, डाटा एन्ट्री ऑपरेटर अशा विविध पोस्टसाठी हा कंत्राटी पद्धतीने भरण्याचा जीआर काढण्यात आला. 1 सप्टेंबर 2021 ला मुख्यमंत्री उद्धव ठाकरे होते त्यावेळी कंत्राटी भर्तीचा जीआर काढण्यात आला, 15 वर्षाकरता कंत्राटी भर्तीसाठी एजन्सी तयार करण्यात आले. आमच सरकार आल्यानंतर एजन्सीचे रेट जास्त आहे, हे माझ्या लक्षात आल्यानंतर यावर लक्ष घातले. कंत्राटी भरतीची सुरवात काँग्रेसने केली आणि आता त्याविरोधात आंदोलन करत आहे. त्यांच्या पापाचे ओझे आमचे सरकार उचलणार नाही म्हणून कंत्राटी भरती रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

### महत्त्वाची बातमी

# एकावर शाई फेकली की दुसरा घालतो

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** मी कुठल्याही परिस्थितीला तोंड द्यायला तयार असतो. माझ्या बॅगेत आठ शर्ट असतात. एकावर शाई फेकली की दुसरा शर्ट घालतो, तिसऱ्या मिनिटाला कामाला लागतो असे राज्याचे मंत्री आणि अमरावतीचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी म्हटले आहे. आत्तापर्यंत माझ्यावर दोनदा शाई फेकण्यात आली. पण मी लगेच कामाला लागलो, असे चंद्रकांत पाटील यांनी म्हटले आहे. चंद्रकांत पाटील हे आज अमरावती दौऱ्यावर होते. पालकमंत्री पदाचा कार्यभार घेतल्यानंतर ते पहिल्यांदाच अमरावतीच्या दौऱ्यावर आले होते. दर आठवड्याला अमरावतीत यावं असा माझा संकल्प आहे. मेळघाटात मोठा निधी जातो पण अमलबजावणी होत नाही हे माझ्या निदर्शनास आले आहे त्यामुळे मी मेळघाटात जाणार असल्याचे चंद्रकांत पाटील यांनी म्हटले आहे. राज्याचे मंत्री चंद्रकांत पाटील यांच्यावर सोलापूर जिल्ह्याच्या दौऱ्यावर होते. त्यावेळी भीम आर्मीने शाईफेक केली होती. राज्य सरकारच्या कंत्राटी धोरणाचा निषेध नोंदवत त्यांनी शाई फेकली होती. त्यानंतर चंद्रकांत पाटील यांनी अमरावतीत बोलत असताना त्यांनी यावर भाष्य केले. माझ्या बॅगेत आठ शर्ट असतात. शाई फेकली की मी लगेच दुसरा शर्ट घालतो, आत्तापर्यंत दोनदा शाई फेकण्यात आली. त्यानंतर तिसऱ्या मिनिटाला शर्ट बदलून बाहेर पडतो, असे चंद्रकांत पाटील म्हणाले. चंद्रकांत पाटील हे सोलापूर जिल्ह्याच्या दौऱ्यावर होते, शासकीय विश्रामगृहामध्ये दाखल झाल्यानंतर त्यांच्यावर शाईफेक करण्यात आली होती. कंत्राटी भरती विरोधात भीम आर्मीच्या पदाधिकाऱ्याने घोषणाबाजी करत हे कृत्य केले होते. चंद्रकांत पाटील येणार म्हणून याठिकाणी पोलिसांचा चोख बंदोबस्त देखील तैनात करण्यात आला होता.

# आमच्या नादी लागू नका, मनोज जरांगे पाटील यांचा सरकारला इशारा

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** मराठ्यांचे नशीब खुप बळकट आहे. सरकार सोडले तर आमच्यावर आतापर्यंत कोणीही अत्याचार केला नाही. मराठ्यांच्या नादी लागू नका, असा थेट इशारा मनोज जरांगे पाटील यांनी राज्य सरकारला दिला आहे. मराठ्यांच्या बाजूने लढण्यासाठी मनोज जरांगे हे मैदानात उतरले आहेत. राज्यभर त्यांच्या सभा सुरु आहेत. त्यात आज राजगुरुनगर येथे जंगी सभेचे आयोजन करण्यात आले आहे. त्यावेळी भाषणादरम्यान त्यांनी राज्य सरकारला इशारा दिला आहे. यावेळी जरांगे म्हणाले की, आमच्या मराठा बांधवानी टोकाचे पाऊल उचलले आहे. त्यांना फक्त सरकार जबाबदार आहे. दुसरे कोणीही नाही. कारण या सरकारने वेळेवर आम्हाला आरक्षण दिले असते तर या घटना घडल्या नसल्याच नसत्या. मी माझ्या मराठा समाजाच्या शब्दापुढे कधीही जाणार नाही. मी माझ्या समाजाला माय बाप म्हणतो. मग माझ्या समाजाची काळजी मी नाही करणार तर कोण करणार तसेच मी एक शेतकऱ्याचा मुलगा आहे. मनोज जरांगे हे युद्ध रोखण्याची ताकद कुणाच्यात नाही. मराठ्यांना आरक्षण द्यायचेच हा माझा शब्द आहे. आरक्षण घेतल्याशिवाय एक इंचही मागे हटणार नसल्याचे जरांगे पाटील यांनी म्हटले आहे. एकानेही आत्महत्या करू नका, जाळपोळ करू नका, शांततेच्या आंदोलनाने सरकारला जेरीस आणायचे आहे, असे म्हणत मराठा समाजाला शांत राहण्याचा सल्ला देखील जरांगे पाटील यांनी दिला आहे. पुणे जिल्ह्यात तीन ठिकाणी मनोज जारांगे यांचे सभा होत आहेत.


# 'सुनेत्रा पवारांच्या उमेदवारीवर योग्य वेळी निर्णय'

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** बारामती लोकसभा मतदारसंघातून उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पत्नी सुनेत्रा पवार निवडणूक लढणार असल्याचीही चर्चा आहे. त्यामुळे बारामतीत नणंद विरुद्ध भावजय असा सामना बघायला मिळणार का? असा प्रश्न निर्माण झाला. सुनेत्रा पवार बारामतीतून निवडणूक लढवणार का? या प्रश्नावर अजित पवार म्हणाले, आम्ही त्यावर विचार करू. जेव्हा वेळ जेईल तेव्हा त्या त्या गोष्टीचा विचार केला जाईल. दरम्यान, बारामतीतून सुनेत्रा पवार लढणार असल्याच्या चर्चेवर राष्ट्रवादी काँग्रेसच्या खा. सुप्रिया सुळे यांनीही प्रतिक्रिया दिली होती. आपण लोकशाही मानतो. त्यामुळे कुणी ना कुणी माझ्याविरोधात लढणारच आहे. त्यामुळे अशा निर्णयाचे पूर्ण ताकदीने स्वागत केले पाहिजे, अशी प्रतिक्रिया सुप्रिया सुळे यांनी दिली होती. सुप्रिया सुळे म्हणाल्या होत्या, माझे म्हणणे आहे की, आमच्याकडे तरी लोकशाही आहे. दिल्लीत काय दडपशाही सुरू असते, हे संपूर्ण देश पाहतोय. पण आमच्याकडे लोकशाहीच आहे. त्यामुळे मला वाटते की, कुणीतरी माझ्याविरोधात लढणारच आहे. आपण या सगळ्या गोष्टींचा मान-सन्मान केला पाहिजे.







विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

# आँखोंसे जो उतरी हैं दिलमें...

आधुनिक केसरी

मुळातच हे ग्रंथ भक्तिरसाने ओतप्रोत भरलेले आहेत, त्यात सांगणाऱ्या बुवांची वाणी रसाळ आणि प्रासादिक असेल तर मग विचारायलाच नको. श्रोते त्या वर्षावात चिंब न्हाऊन निघतात. आताही माध्यम तेच असते. म्हणजे बुवांच्या समोर असलेला प्रासादिक ग्रंथ. पण त्या ग्रंथातील अक्षरे आता बुवांच्या हृदयातील ओलावा, आनंद, प्रसन्नता घेऊन ध्वनीचे रूप धारण करतात. आता त्यांचा हृदयात उतरण्याचा मार्ग बदलतो. डोळ्यांच्या ऐवजी ती कानावाटे प्रवेश करती होतात. कानावाटे हृदयापर्यंत पोहोचतात. पण परिणाम मात्र तोच असतो. आणि तो परिणाम म्हणजे दिव्यानंदाची अनुभूती. ज्ञानेश्वर माऊलींनी जेव्हा ज्ञानेश्वरी सांगितली आणि तेव्हा जे श्रोते हजर असतील, ते किती भाग्यवान म्हणावेत ! ते दृश्य जेव्हा मी कल्पनेने डोळ्यासमोर आणतो, तेव्हा मला दिसते ते मंदिर. माऊली खांबाला ( पैस ) टेकून बसल्या आहेत. समोर त्यांचे बोल आपल्या कानात साठवून घेण्यासाठी चातकाप्रमाणे आतुर झालेला श्रोतृवर्ग बसलेला आहे. बाजूला निवृत्तीनाथ आहेत. माऊलींच्या दोन्ही बाजूला दोन समया प्रकाशमान आहेत. त्या समयांच्या प्रकाश माऊलींच्या मुखमंडलावर पडला आहे. मुळातच तेजस्वी असलेली माऊलींची मुद्रा त्या प्रकाशात आणखीनच दिव्य प्रकाशाने उजळून निघाली आहे. माऊलींच्या मुखातून आता अमृतासमान अशा एकेक ओव्या बाहेर पडताहेत. ओम नमोजी आद्याने सुरुवात झाली आहे. एकामागून एक निरनिराळी रूपके, उपमा घेऊन त्या ओव्या श्रोत्यांच्या हृदयाचा ठाव घेत आहेत. इथे श्रोत्यांची अवस्था फारच बिकट झाली आहे. हा आनंद किती आणि कुठे कसा साठवावा हे त्यांना उमजत नाही. जणू त्यांच्या सर्वांगाचे कान झाले आहेत. ज्ञानेश्वर माऊलींचे अमृतमयी बोल ते आपल्या हृदयात साठवून घेत आहेत. हृदयीचे हृदयी घातले अशी ही अवस्था ! ' तरी आता अवधान दिजे, मग सर्व सुखाते पात्र होईजे ' असे ज्ञानेश्वर माऊली म्हणतात ते उगीच नाही. महर्षी वाल्मिकींनी लिहिलेलं रामायण लव कुश यांनी जेव्हा श्रीरामांच्या दरबारात श्रीराम आणि श्रोत्यांसमोर गायिले तेव्हा सर्वांची काय अवस्था झाली ते आपण रामायणात वाचतोच.





## आनंदी पहाट

# आपलेपणाचा भाव चेहेऱ्यावर स्पष्ट होतो

आधुनिक केसरी



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

आपलं म्हणून ज्यावेळी आपण एखाद्या व्यक्तीचा अथवा गोष्टीचा मनापासून स्वीकार करतो तेव्हाच त्यांमधील आपला सहभाग वाढत जातो. तुझं-माझं करण्याच्या विचारांमुळे असणारा सहभाग केवळ माझ्या स्वतःशी संबंधित गोष्टींशीच राहतो. आपण सहजीवनाचा एकदा स्वीकार केला तरीही, का बरं करतो असं ? दोन किंवा त्यांपेक्षा अधिक व्यक्तींमध्ये मतभिन्नता असणं स्वाभाविक आणि नैसर्गिक असतं. पण मतभेद होत राहणं हे सकारात्मक सहजीवनास बाधक आणि घातक ठरू शकतात, ह्याचं भान राहणं आवश्यक असतं. अनेकदा घडणाऱ्या काही घटना, घडामोडी ह्या निसर्गनियमांमुळे सुरु असल्यासारखं वाटतं. कदाचित सहभागाचा अभाव असल्याचं ते महत्वाचं कारण असावं. सहभागाचा आनंद हा केवळ त्याची प्रचीती आल्याशिवाय मिळत असतो. आपल्या भागाचं, वाट्याचं, नावचं, कर्तव्याचं भान ठेवून सहजीवनात सहभागी होणं महत्वाचं असतं. आनंदप्राप्तीसाठी सकारात्मक वातारणाची निर्मिती करत राहणं गरजेचं असतं. सहजीवानांत सहकाराच्या, सहकाऱ्याच्या आणि सहकार्याच्या भावनाप्रधान विचारानं, मदतीनं सकारात्मक वातावरणाची निर्मिती होत असते. एकमेकांच्या जीवनांत अनावधानानं निर्माण झालेल्या असहकाराच्या विचार, वर्तन आणि व्यवहारानं निर्माण होणारी नकारात्मकता अनेकदा नैराश्यास कारणीभूत ठरत असते. मी आणि माझं ह्या भावविश्वात अडकलेल्या व्यक्ती सहजीवानांत सकारात्मकता आणू शकतातच असं नाही. केवळ स्वतःपेक्षा दुसऱ्याचा, इतरांचा विचार करणारी व्यक्ती नकारात्मक वातावरण निर्माण होण्यासाठी कारणीभूत ठरत नाही. अनेकदा मला खूप काही करायचं असतं, पण सहकार्यच मिळत नाहीअसे सूर अनेकांच्या तोंडून निघत असतात. सहजीवानांत समजून सांगण्याची नाही, तर समजून घेण्याचीच गरज अधिक असते. केवळ आपल्यालाच सगळं कळतं, ह्या भ्रमांत सहकाराची भूमिका कधीच बजावली जात नसते. जाणूनबुजून काहीही जाणून घ्यायचं नाही अशा मानसिकतेत सहकाऱ्याची बाजू त्याची कुवत असून देखील कमकुवत होत राहते.



आधुनिक केसरी

**नामाचीच वीणा| झंकारू दे ||**
**करूनी कागाळी | मानी समाधान ||**
**आनंदाचि वाण | त्याचे भाळी ||१||**
**ज्याच्या पिंडी स्वार्थ | पिशाच्च तो जाण ||**
**विसाव्याचे स्थान | नाही त्यासी ||२||**
**डोंगर खळांचा | मनात वाढता ||**
**गंगेची शुद्धता | कैसी लाभै ? ||३||**
**पापाचाच धनी | होशील तू गड्या ||**
**आता तरी वेड्या | जाग थोडा ||४||**
**एकांती संवाद | साधावा मनाशी ||**
**आत्मचिंतनाशी | जोड मैत्र ||५||**



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## निरुपण


आधुनिक केसरी



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

**नर्काचें कोठार भरलें । आंतबाहेरी लिडीबिडिलें । मूत्रपोतडें जमलें । दुर्गंधीचें ॥१८॥ जंत किडे आणी आंतडी । नाना दुर्गंधीची पोतडी । अमुप लवथविती कातडी । कांटाळवाणी ॥१९॥ सर्वांगास सिर प्रमाण । तेथें बळसें वाहे घ्राण ।**

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

**उतर ज्ञान जेहि हँस में, मतद्रष्टा ऋषि सोय । परम गुरु वह जानिये, अन्य गुरु नहिं कोय ।।२२।।(स्वर्वेद द्वितीय मण्डल तृतीय अध्याय) ०२/०३/२२**

**मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :**

**ज्यांच्या आत्म्यात ईश्वरीय ज्ञान उतरते, त्या श्रुत-ज्ञान-प्रवाही ऋषिंनाच सद्गुरु म्हणून ओळखावे. या व्यतीरिक्त दुसरा कोणीही सद् गुरू नाही. ईश्वरीय धार-प्रवाही महर्षीच सद्गुरु असतात, अन्य नाही.**


..........................................................................

**संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.**

# नामाचे प्रेम येण्यासाठी खरी कळकळ पाहिजे

आधुनिक केसरी

नामाचे प्रेम का येत नाही, हा प्रश्न बहुतेकजण विचारतात. पण थोडासा विचार केला तर असे लक्षात येईल की, हा प्रश्नच बरोबर नाही. मूल न झालेल्या बाईने, 'मुलाचे प्रेम कसे येईल ?' असे विचारण्यासारखाच हा प्रश्न आहे. मूल झाले की प्रेम त्याच्याबरोबरच येत असते. तेव्हा 'मुलाचे प्रेम कसे येईल' हा प्रश्न करण्याऐवजी 'मूल कसे होईल' याचाच विचार करणे बरोबर ठरेल. आपणसुद्धा प्रश्न करायचाच असेल तर 'नामाचे प्रेम कसे येईल' असा करण्याऐवजी, 'मुखी नाम कसे येईल' असा प्रश्न करणे बरोबर होईल. मुखी नाम यायला वास्तविक आडकाठी कोणाची आहे ? दुसऱ्या कोणाचीही नसून आपली स्वतःचीच आहे. वास्तविक, एकदा नाम घ्यायचे ठरवून सुरूवात केली की झाले. पण तसे होत नसेल तर, दोष दुसऱ्या कोणाचा नसून आपला स्वतःचाच आहे. म्हणून नाम घेणे हे आपले काम आहे; मग त्याच्या पाठोपाठ येणे हा प्रेमाचा धर्मच आहे. जसे आईच्या बाबतीत, मूल आणि प्रेमाचा पान्हा ही निराळी असूच शकत नाहीत, तसे नाम



आणि त्याचे प्रेम ही एकमेकांना सोडून राहूच शकत नाहीत. ह्यावरून एक गोष्ट अशी ठरली की, 'प्रेम का येत नाही', याचे उत्तर आमच्याजवळच आहे, आणि ते म्हणजे, 'नाम घेत नाही म्हणून.' यावर कोणी असे म्हणेल की, आम्ही नाम घेतोच आहोत, तरीही प्रेम का येत नाही ? हे विचारणे ठीक. पण आता आम्ही जे नाम घेतो म्हणून म्हणतो, त्याचा विचार केला तर काय दिसेल ? पोटी जन्माला आलेल्या मुलाबद्दल जसा कळवळा असतो, तसा नामाबद्दल आपल्या ठिकाणी कळवळा नसतो. सर्व संतांनी किंवा आपल्या गुरूने, नाम घ्यावे असे सांगितल्यामुळे आपण ते घेतो, किंवा दुसरे काही करायला नाही म्हणून घेतो, इतकेच. अर्थात्, तसे घेतले तरी आज ना उद्या आपले काम होईलच. पण 'प्रेम का येत नाही', असा प्रश्न विचारण्यापूर्वी, आपण नाम किती आस्थेने घेतो, हा प्रश्न स्वतःला विचारणे जरूर आहे. एखाद्या बाईला फार दिवसांनी मूल झाले तर त्याच्याबाबतीत तिची जी स्थिती होते ती नामाच्या बाबतीत आपली होणे जरूर आहे. आपल्या देहाची वाढ जशी आपल्याला नकळत होते, तशी आपली पारमार्थिक उन्नतीही आपल्याला नकळत झाली पाहिजे. ती कळली तर सर्व फुकट जाण्याचा संभव असतो. परमार्थात 'मिळविण्यापेक्षा' मिळविलेले 'टिकविणे', हेच जास्त कठीण आहे. ज्याला 'मी काही तरी झालो' असे वाटते तो काहीच झालेला नसतो. अशा माणसाने फारच सांभाळले पाहिजे.

## शारदीय नवरात्र (माळ पाचवी)

आधुनिक केसरी

शारदा म्हणजे मूळमाया, मूळमायेचे जे शक्तिवर्धक अंग आहे तिच्या मध्ये सत्व, रज, तम हे तीन गुण आणि पृथ्वी, आप, तेज, वायु, आकाश ही पंचमहाभूते सुक्ष्म रूपाने वास करत असतात. त्यालाच अष्ट्याप्रकृती किंवा गुणक्षोभिणी म्हणतात. देवी शारदेला गुणक्षोभिणी हे नाव किती सार्थ आहे. जिच्या हाती, परशु, अक्षमाला, रत्नजडित गदा, कमळ पुष्प, वज्र, धनुष्य, दण्ड, निरनिराळ्या शक्ति, चर्मढाल, शंख, घंटा, शिळ, फास ही आयुधे शत्रुच्या झुंजी साठी आहेत. लढण्यासाठी सज्ज आहेत. ती सुदर्शना तर आहेच. पण चेहऱ्यावर मोहक व सुप्रसन्न भावही आहेत. अशा या महिषासुरमर्दिनी, महालक्ष्मी, कमलवासिनीला माझा सतत नमस्कार असो. देवी कथा शेकडो वर्षांपूर्वी देव दानवांच्यात युध्द झाले.त्यात देवांच्या बाजूने देवांचा राजा इंद्र आणि राक्षसांच्या बाजूने राजा महिषासुर होता. या युध्दात असुरांच्या महाप्रतापी वीरांनी देवसेनेचा पराभव केला. देवांना पूर्ण पणे जिंकून इंद्राचे इंद्रपदहि हिसकावून घेतलं आणि महिषासुर इंद्रपदी बसला. इंद्राच्या सिंहासनावर महिषासुर राक्षस बसला. कल्पना करा देवाच इंद्रपद राक्षसाच्या हाती. या राक्षसांनी देवांचा ही पराभव केला तर तुमच्या आमच्यासारख्यांची काय अवस्था असेल विचार करा ? देवचं ते फक्त आपलाचं विचार करणारं का ? त्यांना पृथ्वी लोकांची काळजी असणारं ना!!!! देव पृथ्वीवरच्या लोकांच्या रक्षणाचा विचार करून कमलनिवासी ब्रम्हदेवांकडे गेले त्यांनी ब्रम्हदेवाला गरूड वाहनांवर आरूढ होणा-या विष्णु कडे नेण्याची विनंती केली. युध्दात घडलेल्या सर्व घटना म्हणजे देवांचा पराभव व महिषासुराच्या विजयाची बातमी देवांनी ब्रम्हदेवांना व भगवान विष्णु नां सांगितली. आपल्यावर झालेल्या अन्यायाची बातमी त्यांनी भगवान विष्णुंनी सांगितली. इंद्र,सुर्य, चंद्र, अग्नी,यम,वरूण यांचे अधिकार काढून घेऊन रिकाम्या जागेवर परस्पर आपल्या मर्जीतील अधिका-यांना बसवले.त्यांची नेमणूक करण्यात आली. बोलून चालून राक्षसचं ते सर्व सामान्यांना अजून त्रास देऊ लागले. महिला, नुकतेच जन्मलेले अर्भक, वृध्द, तरूण कुणाचीही राक्षस पर्वा करत नव्हते. अगदी उच्छाद मांडलेला होता. एवढा ते त्रास देत होते. पराजयाने विषण्ण झालेले देवगण स्वर्गातून महिषासुराने हाकलून दिल्याने मानवा प्रमाणे पृथ्वीवर सगळीकडे भकू लागले. दैत्यांनी केलेली आमची दुर्दशा आम्ही आपल्याला सांगितली, आम्ही शरण आलो आहोत. आता महिषासुराचा पराभव करून त्याला नष्ट करा, काहीतरी मार्ग काढा. देवांचे हे गा-हाणे ऐकून मधूराक्षसाला (जो सर्वात दुष्ट राक्षस)ठार मारणारे सर्वात बलवान श्री विष्णु व भगवान शंकर अतिशय **क्रमशः**



सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
शनिवार, २१ ऑक्टोबर २०२३
adhunikkesari.com Adhunik Kesari

## नम्रता, सचोटी आणि सर्वसमावेशकता असलेलं नेतृत्व

# अमित पाटील खडसे



आधुनिक केसरी

राजकारणात अनेक जण येतात आणि आपापल्या कार्यपद्धतीने समाजात आपला वेगळा ठसा उमटवून जातात.मात्र काहीजण केवळ सामाजिक कार्याची व्याप्ती वाढावी केवळ याच उद्देशाने राजकारणाचा मार्ग अवलंबतात. त्यातून आपल्या सामाजिक कार्याची हौस पुरी करतात.अशापैकीच एक असलेले रिसोड तालुक्यातील भर (जहाँगीर) जिल्हा परिषद सर्कलचे जिल्हा परिषद सदस्य तथा जिल्हा नियोजन समितीचे सदस्य अमित पाटील खडसे. नम्रता, सचोटी आणि सर्वसमावेशकतेचा त्रिवेणी संगम असलेल्या या सृजशील नेतृत्वाचा आज दि. २१ आक्टोबर हा जन्मदिवस त्यानिमित्ताने त्यांच्या सामाजिक व राजकीय प्रवासाचा हा संक्षिप्त परिचय.

**हयात ले के चलो कायनात ले के चलो,**
**चलो तो सारे जमाने को साथ ले के चलो!!**

खरोखर या दोन ओळी अमित पाटील खडसे यांच्या सामाजिक व राजकीय प्रवासाच्या दृष्टीने समर्पक ठरतात. त्याला कारण ही साजेशे असेच आहे. वाशिम जिल्ह्याची राजकीय राजधानी म्हणून रिसोड तालुक्याची ख्याती आहे. जिल्ह्यातील बऱ्याच आजी, माजी आमदार आणि खासदार यांची जन्मभूमी रिसोड आहे. आणि या सर्व राजकारणाचं उगमस्थान रिसोड तालुक्यातील ' शेलुखडसे हे गाव असल्याचं अभिमानाने इथे नमूद करावे वाटते. स्वतंत्रपूर्व काळात ब्रिटिश राजवटीत याच गावातील उच्चशिक्षित सधन शेतकरी स्व. नारायणराव पाटील खडसे हे तत्कालीन लोकल बोर्डाचे चेअरमन होते. तद्वतच स्वातंत्र्यप्राप्ती नंतर पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीत वाशिम जिल्ह्यातील पहिला आमदार होण्याचा बहुमान सुद्धा स्व. नारायणराव पाटील खडसे यानींच मिळवला आहे. त्यांचेच पणतू म्हणजेच, आजच्या अभिष्टचिंतन सोहळ्याचे सत्कारमूर्ती श्री अमित पाटील खडसे हे आहेत. राजकीय वारसा


वसंत खडसे
9373578429

लाभलेल्या सधन कुटुंबातील अमित पाटील यांचे वडील श्री बाबाराव पाटील खडसे हे राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्वेसर्वा शरदचंद्र पवार यांचे विश्वासू सहकारी म्हणून जिल्ह्यातील सुप्रसिद्ध व्यक्तिमत्व प्रसिद्ध आहेत. ते राष्ट्रवादीचे विद्यमान जिल्हाध्यक्ष सुद्धा आहेत. असा प्रगल्भ राजकीय वारसा असलेल्या परिवारात जन्मुन सुद्धा अमित पाटील खडसे यांच्या स्वभावात येतकिंचीतही अहंकार नाही,हीच अमित पाटील यांच्या राजकीय यशाची गुरुकिल्ली आहे. M. SC. कृषी शाखेतून पारंगत झालेले पाटील यांनी शासकीय नोकरीच्या फंद्यात न पडता समाज कार्याची आवड असल्याने श्री गॅस एजन्सीच्या मध्यामातून आपल्या समाजसेवेचा आरंभ केला. तद्वतच आपल्या वडीलांनी स्थापित केलेल्या जीवन विकास शिक्षण संस्थेचे सचिव म्हणून ते काम पाहत आहेत. त्यांचा निर्गर्विष्ठ स्वभाव आणि स्वतः उच्चशिक्षित असल्याने ते केवळ प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांतच नव्हे; तर विद्यार्थ्यांना सुद्धा आदरणीय आहेत. घराण्याला लाभलेला प्रचंड राजकीय वारसा असला तरी, राजकारणात प्रवेश करण्याची त्यांची मुळीच इच्छा नव्हती.कारण दिवसागणिक घाणेरडे होत चाललेल्या राजकारणाचा त्यांना खुप तिटकारा आहे. पण सामाजिक कार्याची ओढ त्यांना स्वस्थ बसू देत नव्हती. गॅस एजन्सी, शैक्षणिक संस्था, आणि बालाजी सुतगिरणीच्या माध्यमातून त्यांचे कार्य सुरूच होते. त्यांच्या अंगी असलेली नम्रता, स्पष्टता, मनमिळावू स्वभाव आणि सर्व जाती, धर्मातील गोरगरीब घटकांना सोबत घेऊन चालण्याची वृत्ती यामुळे अमित पाटील अल्पावधीतच सर्व सामान्यांच्या मनातील आदराचे स्थान बनले. याहीपेक्षा युवकांच्या गळ्यातील ताईत बनले. परिणामी सामाजिक कार्याची व्याप्ती वाढावी यासाठी खास लोकाग्रहास्तव त्यांनी राजकारणात प्रवेश केला. त्यांच्या वडिलांवर असलेला शरदचंद्रजी पवार यांच्या विचारधारेचा प्रभाव आपसूकच त्यांच्यावर पण पडला. यातूनच त्यांनी राष्ट्रवादीच्या घड्याळ चिन्हावर भर जहाँगीर जिल्हा परिषद सर्कल मधून आपल्या आयुष्यातील पहिली निवडणूक लढविली. त्यांच्या अंगी असलेल्या गुणांचा उपरोक्त संदर्भ दिलेलाच आहे.त्यामुळे अपयशाची शंका मुळीच नव्हती, अखेर अमित पाटील खडसे प्रचंड मतांनी विजयी झाले.आज एक तत्पर व कर्तव्यनिष्ठ जिल्हा परिषद सदस्य म्हणून ते संपूर्ण जिल्ह्यात नावारूपास आले आहेत. त्याला कारण ही तसेच आहे, ते राजकारण कमी आणि समाजकारणावर" भर " जास्त देतात त्यामुळेच भर जहाँगीर सर्कलचे नाव सुद्धा लौकीकास पात्र ठरत आहे. अशा या सृजशील नेतृत्वास वाढदिवसा निमित्त दैनिक आधुनिक केसरी परिवाराकडून हार्दिक शुभेच्छा..!

## गेहलोत यांचा केंद्रीय नेतृत्वाला इशारा

आधुनिक केसरी न्यूज



**नवी दिल्ली :** 'मी कधीपासून मुख्यमंत्रीपद सोडायला तयार आहे; पण हे पद मला सोडत नाही. ते मला कधी सोडेल असे वाटत नाही,' अशी मिश्कील टिप्पणी राजस्थानचे मुख्यमंत्री अशोक गेहलोत यांनी गुरुवारी दिल्लीतील पत्रकार परिषदेत केली; पण या टिप्पणीमधून गेहलोत यांनी मुख्यमंत्रीपदावर आपलाच हक्क असल्याचे स्पष्ट केले. सचिन पायलट तसेच, केंद्रीय नेतृत्वाला दिलेला हा अप्रत्यक्ष इशारा असल्याचे मानले जात आहे. या वेळी गेहलोत म्हणाले की, सोनिया गांधी, राहुल गांधी व प्रियंका गांधी यांचा माझ्यावर विश्वास आहे म्हणूनच त्यांनी मला या पदावर कायम ठेवले आहे. मोदींविरोधात थेट लढणारे राहुल गांधी हे एकमेव नेते आहेत, त्यांचे हात मजबूत केले पाहिजेत असे ते म्हणाले. काँग्रेसच्या केंद्रीय नेतृत्वाने अशोक गेहलोत व सचिन पायलट यांच्यातील वाद मिटवल्याचे सांगितले जाते. तरीही, गेहलोत सातत्याने पायलटांच्या बंडाचा उल्लेख करत होते. मात्र, पायलट यांच्याशी मतभेद नाहीत, असे गेहलोत म्हणाले. विधानसभा निवडणुकीसाठी आचारसंहिता लागू असतानाही सीबीआय, ईडी नेत्यांच्या मालमत्तांवर छापे टाकत आहेत. खरे तर आचारसंहितेमध्ये हे छापे थांबले पाहिजेत. तपास यंत्रणाच्या चौकशीचा ससेमिरा चालूच राहिला तर लोक माफ करणार नाहीत, असा इशारा गेहलोत यांनी दिला. भाजपच्या नेत्या व माजी मुख्यमंत्री वसुंधरा राजेंवर त्यांच्या पक्षामध्ये अन्याय होत असल्याच्या मुद्दयावर गेहलोत यांनी भाजपच्या केंद्रीय नेतृत्वाला टोला हाणला. 'माझ्यामुळे वसुंधरा राजेंना शिक्षा कशासाठी देता? त्यांच्यावर अन्याय करू नका,' असे गेहलोत म्हणाले.

## प्रवाशांसाठी विशेष रेल्वे गाड्या धावणार

आधुनिक केसरी न्यूज

**अकोला :** दिवाळीच्या काळात प्रवाशांची अतिरिक्त गर्दी लक्षात घेता अमरावती-पुणे आणि बडनेरा-नाशिक दरम्यान उत्सव विशेष मेमू रेल्वे गाड्या चालविण्याचा निर्णय मध्य रेल्वेने घेतला आहे. या दोन गाड्यांच्या एकूण ३६ फेऱ्या होणार आहेत. अमरावती-पुणे मेमू गाडी क्रमांक ०१२०९ विशेष मेमू अमरावती येथून ०५ ते नोव्हेंबरपर्यंत दर रविवारी आणि बुधवारी १२.४० वाजता सुटेल आणि पुणे येथे दुसऱ्या दिवशी ०२.४५ वाजता पोहोचेल. गाडी क्रमांक ०१२१० विशेष मेमू पुणे येथून ०६ ते २० नोव्हेंबरपर्यंत दर गुरुवार आणि सोमवारी ०६.३५ वाजता सुटेल आणि अमरावती येथे त्याच दिवशी १९.५० वाजता पोहोचेल. या गाडीला अमरावती, बडनेरा, अकोला, मलकापूर, भुसावळ, जळगाव, मनमाड, कोपरगाव, अहमदनगर, दौंड, उरुळी, हडपसर आणि पुणे येथे थांबा आहे. गाडीला आठ कार मेमू रेक राहणार आहे. बडनेरा-नाशिक मेमू गाडी क्रमांक ०१२११ विशेष मेमू बडनेरा येथून दि. ०६ ते १९ नोव्हेंबरपर्यंत दररोज ११.०५ वाजता सुटेल आणि नाशिक येथे त्याच दिवशी १९.४० वाजता पोहोचेल. गाडी क्रमांक ०१२१२ विशेष मेमू नाशिक येथून ०६ ते १९ नोव्हेंबरपर्यंत दररोज २१.१५ वाजता सुटेल आणि बडनेरा येथे दुसऱ्या दिवशी ०४.३५ वाजता पोहोचेल.

## भगवानराव कोकाटे यांच्या वाढदिवसानिमित्त आरोग्य शिबिर

### मोफत नेत्र ऑपरेशन व दिव्यांगांसाठी मोफत उपचार

आधुनिक केसरी न्यूज

**यासीन शेख**

**लोणार :** आदिवासी नेते,माजी उपसभापती तथा संचालक कृषी उत्पन्न बाजार समिती लोणार भगवानराव कोकाटे यांच्या वाढदिवसानिमित्त मोफत भव्य नेत्ररोग, अस्थिरोग,हृदयरोग मधुमेह, दंतरोग,बालरोग व दिव्यांग चिकत्सा, उपचार व शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन २२/१०/२०२३ रोज रविवारी जि.प.शाळा टिटवी येथे करण्यात आले. या कार्यक्रमाचे उद्‌घाटन खासदार प्रतापराव जाधव यांच्या हस्ते तर कार्यक्रमाचे अध्यक्ष आमदार संजय रायमुलकर राहणार आहे प्रमुख उपस्थित म्हणून माजी आमदार संतोष टारपे, कळमनुरी, बळीराम मापारी सभापती कृ.उ.बा.स.लोणार, नंदकिशोर मापारी अध्यक्ष शिवछत्र



मित्र मंडळ लोणार, तहसीलदार गिरीश जोशी, शिवसेना तालुकाप्रमुख भगवान सुलताने, जिल्हाध्यक्ष स्व.धा. दुकानदार संघटना,राजेश अंबुसकर, गट विकास अधिकारी उमेश देशमुख, ठाणेदार मिनीश मेहेत्रे, सिद्धार्थ अंभोरे उपस्थित राहणार आहेत. शिबिरामध्ये हृदयरोग, नेत्ररोग, मधूमेह, बालरोग, व दिव्यांगासाठी मोफत उपचार मोफत नेत्र ऑपरेशन करण्यात येणार आहे. या शिबिरासाठी तज्ञ डॉक्टर डॉ.अ.शं. गायकवाड हृदय रोग तज्ञ, डॉ.आशिस चांगडे हृदयरोग तज्ञ मेहकर, डॉ.सातपूते अस्थी रोग तज्ञ मेहकर, डॉ.विश्वास सानप नेत्र तज्ञ, डॉ.फेरोज शहा अधिक्षक ग्रा.रु. लोणार, डॉ.देवशाला बलसेटवाल, आरोग्य अधिकारी, डॉ.सोनाली मुंदडा स्त्री रोग तज्ञ, डॉ.धांडे बालरोग तज्ज्ञ, डॉ.नामदेव डाखोरे वैद्यकीय अधिकारी पिंपळगाव (गंगाखेड), डॉ.आघाव, डॉ.गोपीचंद मुंढे, डॉ.के.आर. घुगे असे तज्ञ डॉक्टर शिबिरासाठी उपस्थित राहणार आहेत. या होणाऱ्या भव्य शिबिराचा जास्तीतजास्त रुग्णांनी लाभ घ्यावा असे आवाहन ग्रामपंचायत टिटवी, बिरसा क्रांती दल लोणार व भगवानराव कोकाटे मित्र मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.



## सहपालक मंत्रीपदाचा वाद

आधुनिक केसरी

पुण्याला वर्षभर पिण्यासाठी पुरेल एवढा जुलै अखेरपर्यंत पाणीसाठा राखीव ठेवण्याचा निर्णय कालवा सल्लागार समितीच्या बैठकीत घेण्यात आला आहे. तसेच रब्बी हंगामासाठी शेतीलाही पाणी देण्याचे ठरले आहे, अशी माहिती पालकमंत्री तथा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पुण्यात शुक्रवारी दिली. खडकवासला प्रकल्पाच्या कालवा सल्लागार समिती बैठकीस सहकारमंत्री दिलीप वळसे पाटील, आमदार दत्तात्रय भरणे, रवींद्र धंगेकर, संजय जगताप, भीमराव तापकीर, चेतन तुपे, माजी मंत्री हर्षवर्धन पाटील, पुणे महानगरपालिका आयुक्त विक्रमकुमार, पिंपरी चिंचवड मनपा आयुक्त शेखर सिंह, जिल्हाधिकारी डॉ. राजेश देशमुख, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रमेश चव्हाण, कृष्णा खोरे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक अतुल कपोले, मुख्य अभियंता हणुमंत गुणाले, अधीक्षक अभियंता सुनंदा जगताप आदी उपस्थित होते. त्या बैठकीनंतर पालकमंत्री अजित पवार यांनी पत्रकारांना माहिती दिली.
पालकमंत्री अजित पवार म्हणाले, ‘यंदाच्या वर्षी काही भागात पाऊस चांगला, तर काही भागात कमी तसेच काही भागात मध्यम स्वरुपाचा पाऊस झाला आहे. पुण्यातील खडकवासला, वरसगाव, पानशेत आणि टेमघर धरणांची चांगली स्थिती आहे. पाणलोट क्षेत्रात कमी पाऊस झाल्याने शेतकऱ्यांची नीरा डावा, उजवा, खडकवासला चासकमान कालवा, कुकडी आणि घोड कालवा येथून पाण्याची मागणी आहे. त्यामुळे रब्बी आणि उन्हाळ्यात पाण्याचे नियोजन कसे असावे यावर चर्चा झाली. खडकवासला धरणातील पिण्यासाठी लागेल तेवढे पाणी जुलै अखेरपर्यंत शिल्लक ठेवायचे आणि उर्वरीत पाण्याचे रब्बीच्या पिकांसाठी नियोजन करायचे आहे. खडकवासला साखळी प्रकल्पातील धरणांची स्थिती चांगली असल्याने पुण्याला अडचण नाही. फक्त वीर धरणातील नीरा डावा कालव्याचे गेल्या वर्षीच्या तुलनेत साडेतीन टीएमसी पाणी कमी आहे. त्यामुळे तेथे काटकसर करावे लागेल.’ पिंपरी चिंचवडला पवना धरण पूर्ण भरले आहे. त्यामुळे पिण्याच्या पाण्यासाठी काही अडचण येणार नाही. उपलब्ध पाण्याचा शक्य तेथे काटकसर करणे गरजेचे आहे. पुणे महापालिका आयुक्त आणि जलसंपदा विभाग एकत्र बसून पाण्याबाबत काय मार्ग काढता येईल यासाठी सात दिवसांची मुदत पालिका आयुक्तांनी मागितली आहे. पुढील आठवड्यात त्याबाबत पुन्हा आढावा घेतला जाईल, असे पवार म्हणाले.



बाळासाहेब जोगदंड
संपर्क क्र. 9423051246

## कामगार रुग्णालय: स्त्रीरोग विभाग उपचारात अव्वल

आधुनिक केसरी

**एमआयडीसी चिकलठाणा औरंगाबाद येथील राज्य कामगार विमा योजना रुग्णालयातील स्त्रीरोग विभागाने रुग्णांचा विश्वास संपादन करीत त्यांच्याशी घट्ट नाते जपत घरातील सदस्यांसारखे महिला रुग्णांना मार्गदर्शन, उपचार दिले आहेत. मनापासून उपचार देणाऱ्या या विभागातील पाचही महिला डॉक्टरांचे कौतुक अलौकिकास प्राप्त ठरले आहे. या पाचही महिला 'ती 'च्या आरोग्य समस्यांना समजून घेत त्यांच्यावर विशेष उपचार करण्यात हा विभाग अव्वल ठरला आहे. म्हणूनच या पाचही महिला डॉक्टर " कर्तुत्वान नवदुर्गा "म्हणून नोंद घेण्यास पात्र ठरल्या आहेत. औद्योगिक क्षेत्रात काम करणाऱ्या सर्व कामगार आणि कुटुंबासाठी औरंगाबादच्या एमआयडीसी चिकलठाणा भागात कामगार रुग्णालय कार्यरत आहे.**

या रुग्णालयातील स्त्रीरोग विभागाने रुग्णसेवेप्रती बांधिलकी जपत एक यशस्वी पाऊल पुढे टाकले आहे. या विभागातील विभागप्रमुख डॉ. मीनाक्षी राठोड (MBBS ,MD), डॉ. दीप्ती टाक ( MBBS ,MS),डॉ. ज्योती राठोड (MBBS ,DGO), डॉ. सुप्रिया लोखंडे (MBBS ,MS),डॉ. कोकिळा गायकवाड (MBBS ,MS) या उच्चविद्याविभूषित पाचही महिला डॉक्टरांनी आपल्या विभागात दररोज येणा-या 70 ते 80 महिला रुग्णांची तपासणी करणे, त्यांना योग्य मार्गदर्शन करणे हे काम निष्ठेने करतात. सोबतच अतीजोखमीच्या शस्त्रक्रिया, सिझेरियन बाळंतपण, कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया, गर्भाशयातील लहान मोठया गाठी काढणे, वंध्यत्व उपचार इत्यादी लहान मोठ्या शस्त्रक्रिया करून विभाग रुग्णसेवेत आघाडीवर ठेवला आहे. या पाचही महिला डॉक्टरांनी आपसातील समन्वय कदापि ढळू न देता आरोग्यसेवेत तत्परतेने केलेली मदत ही या विभागाची जमेची बाजू म्हणता येईल. म्हणूनच उपचारातून बरे झालेल्या रुग्णांच्या चेहऱ्यावरील हसू हे विभागाच्या कामकाजात आनंदी भर घालत आहेत. या पाचही महिला डॉक्टर कर्तव्यतत्पर असून दररोज सकाळी वेळेवर येऊन आपल्या विभागाचे कामकाज सुरू करतात. योग्य उपचार, रुग्णाप्रती विश्वास आणि रुग्णांचा ऋणानुबंध यांचा त्रिवेणी संगम घडवून आणण्यात या पाचही महिला डॉक्टर आघाडीवर राहिलेल्या दिसतात. या विभागातून 24 तास सेवा रुग्णांना दिली जाते. हायरिस्क बाळंतपणे, नॉर्मल डिलिव्हरी, सिझेरियन वेळेच्या वेळी करून आपल्या रुग्णसेवेची घडी कोणत्याही प्रकारे विस्कटणार नाही, रुग्णांना त्रास होणार नाही यासाठी या पाचही महिला डॉक्टर नेहमीच प्रयत्नशील राहिलेल्या दिसतात. स्त्रीरोग कक्षात भरती रुग्णांनी वेळोवेळी देखभाल करणे, काम संपवून घरी गेल्यावर देखील रात्री अपरात्री रुग्णालयाच्या संपर्कात राहणे हे देखील या विभागाचे वैशिष्ट्य म्हणावे लागेल. सोबतच स्त्रीरोग विभागाने अवघड शस्त्रक्रिया करून रुग्णालयाच्या जडणघडीत एक वेगळेपण निर्माण केलेले दिसते. विभागाच्या कामकाजात पारदर्शकता ठेवल्यामुळे रुग्णांची प्रतिक्रिया विभागाचे वैभव वाढवित असते. मागील तीन-चार वर्षात विभागाने कार्याचा उच्चांक निर्माण केल्यामुळेच कामगार रुग्णालयाच्या प्रशासनाने या पाचही महिला डॉक्टरांचे वेळोवेळी कौतुक केले आहे. सुसज्ज शस्त्रक्रियागृह, सर्व औषधी उपलब्ध असल्यामुळे आणि सोनोग्राफी विभागाची सदैव मदत रुग्णांसाठी होत असल्याने ही जमेची बाजू ठरली आहे. तसेच लवकरच अतिदक्षता विभागाचे होत असलेले पदार्पण आम्हाला आणखी दर्जेदार काम करण्यासाठी प्रेरक ठरणार असल्याची भावना या महिला डॉक्टर बोलून दाखवतात. कामगार रुग्णालय आधुनिकतेकडे वाटचाल करीत असताना "आयपी इज व्हीआयपी" या ब्रीदवाक्याप्रमाणे रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. सचिन फडणीस, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रतिभा पाळवदे आणि इतर अधिकारी ,कर्मचारी वृदांचे सहकार्य लाभत असल्याने या स्त्रीरोग विभागाची वाटचाल अभिनंदनीय ठरली आहे. म्हणूनच या पाचही कर्तृत्वान नवदुर्गांना नवरात्र उत्सवानिमित्त आधुनिक केसरीचा त्रिवार सलाम..!

**रुग्णांच्या चेहऱ्यावरील आनंद ठरतोय महत्त्वाचा** : कामगार रुग्णालयात रुग्णाला उपचार मिळाल्यावर त्यांच्या चेहऱ्यावर आलेले हसू आणि त्यातला आनंद मला आणि माझ्या टीमला खूप प्रेरणादायी ठरतो आहे . आणि हीच प्रेरणा आम्हाला आणखी उर्जा देत असते . विनातक्रार रुग्णसेवा, रुग्णांप्रती आमची आपुलकी आणि प्रत्येक रुग्णांशी स्नेह आम्हां सर्वासाठी मोलाचा वाटतो . हाच खूप मोठा आनंद वाटतो . आणि हीच ऊर्जा आम्ही काय जपणार आहोत . – **डॉ . मीनाक्षी राठोड, स्त्रीरोग विभागप्रमुख कामगार रुग्णालय औरंगाबाद .**





श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र. : ९९२२५४६२९५

## पोलिस हुतात्मा दिन

आधुनिक केसरी

**आज २१ ऑक्टोबर, आजचा दिवस संपूर्ण देशात पोलीस हुतात्मा दिन म्हणून पाळला जातो. अखंड देशासाठी त्यागाची भावना ठेवून कर्तव्यावर असलेले अनेक पोलीस जवान शहीद होतात त्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ हा दिवस पाळण्यात येतो. २१ ऑक्टोबर १९५९ रोजी पोलिस दलातील १० पोलीस शिपाई लडाख हद्दीत भारत - तिबेट सीमेवर व दोन हजार पाचशे हॉट ग्रीन या सीमेवर निर्जन बर्फाछादित प्रदेशात कडाक्याच्या थंडीत गस्त घालत असताना धोकादायक पद्धतीने दबा धरून बसलेल्या चिनी सैनिकांच्या हल्ल्यात शहीद झाले. या दिवसाची आठवण रहावी तसेच देशामध्ये दहशतवादी हल्ल्यात, नक्षलवादी कारवाईत, समाज कंटक तसेच हिंसक कृत्य करणाऱ्यांकडून कर्तव्यावर असताना शहीद झालेल्या जवानांच्या स्मृतीला या दिवशी उजाळा दिला जातो.**

२४ तास ऑन ड्युटी असे पोलिसांचे वर्णन केले जाते कारण जनतेच्या सेवेसाठी ते २४ तास तयार असतात. गणेशोत्सव असो की नवरात्री, दसरा असो की दिवाळी, ईद असो की नाताळ देशातील जनतेला सुरक्षित ठेवण्यासाठी ते कायम तत्पर असतात. जेंव्हा आपण आपल्या घरात आपल्या कुटुंबासोबत हे सण साजरे करत असतो तेंव्हा ते आपल्या सुरक्षेसाठी कुटुंबापासून दूर असतात. त्यांच्यामुळेच आपण सर्व सण, उत्सव आनंदाने साजरे करू शकतो. कोणतही आपत्ती येऊ मग ती मानवनिर्मित असो की निसर्गनिर्मित जनतेच्या रक्षणासाठी सर्वात प्रथम पोलीसच हजर असतात. पोलिस जनतेच्या सुरक्षेसाठी काय करू शकतात हे मुंबईवर झालेल्या २६/ ११ च्या पाक पुरस्कृत हल्ल्यात संपूर्ण जगाने पाहिले आहे. केवळ पोलिसांच्या धाडसामुळे मुंबईवर हल्ला करण्याचा पाक पुरस्कृत दहशतवाद्यांचा डाव त्यांच्यावरच उलटला. प्राणाची बाजी लावून पोलिसांनी मुंबई वाचवली. या हल्ल्यात अनेक पोलीस शहीद झाले स्वतःच्या प्राणांची आहुती देऊन पोलिसांनी मुंबई करांचा जीव वाचवला. १९९२ साली झालेल्या जातीय दंगलीतही पोलिसांचे कार्य अतुलनीय होते. कोरोना सारख्या महामारीत तर पोलिसांचे महत्व आणखी अधोरेखित झाले. देश वासियांना कोरोनाच्या महामारीपासून वाचवण्यापासून पोलिसांनी जे कार्य केले त्याला तोड नाही. कोरोनाने हजारो पोलिसांचा बळी घेतला तरी पोलीस आपल्या कर्तव्यावरून तसूभरही हलले नाहीत. पंतप्रधानानांनी त्यांना कोविड त्यांच्या या कार्यासाठी कोविड योध्दा ही उपाधी दिली होती. पंतप्रधानांनी दिलेली कोविड योद्धा ही उपाधी सर्वार्थाने योग्य होती. देशातील कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी आपल्या कुटुंबाची पर्वा न करता बारा ते अठरा तास प्रसंगी सुट्टी न घेता कर्तव्यावर राहून मातृभूमीचे रक्षण करण्यासाठी अनेक जवान शहीद होतात. दहशतवादी, नक्षलवादी यासारख्या देशविघातक शक्तिंविरूद्ध लढताना काहींना विर मरण येते अशा शहीद पोलीस जवानांचे स्मरण करून त्यांच्या पवित्र स्मृतीस अभिवादन करणे हे देशातील प्रत्येक नागरिकाचे कर्तव्यच आहे. या दिवशी सरकारच्या वतीने पोलीस हुतात्मा स्मारकास पुष्पचक्र शहीद पोलीस जवानांना मानवंदना दिली जाते. हा दिवस देशातील सर्व पोलीस दलाचे अधिकारी व कर्मचारी यांच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा व पवित्र आहे. पोलिस हुतात्मा दिनानिमित्त शहीद पोलीस जवानांना विनम्र अभिवादन!



हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# नवसाला पावणारी बालम टाकळीची बालंबिका देवी

## शारदीय नवरात्रोत्सवात देवी दर्शनासाठी भाविकांचा महापूर

आधुनिक केसरी न्यूज



**जयप्रकाश बागडे**

**शेवगाव :** महाराष्ट्रातील देवीचे साडेतीन पीठ म्हणजे तुळजापूरची तुळजाभवानी ,कोल्हापूरची लक्ष्मी माता ,माहूरची रेणुका माता व अर्धे पीठ वणीची सप्तशृंगी माता ,माहूरच्या रेणुका देवीचे साक्षांत रूप म्हणजे बालमटाकळी व परिसराचे आराध्य दैवत व ग्रामदैवत असलेले श्री बालंबिका देवी शारदिय नवरात्रोत्सव व जानेवारी महिन्यातील पौष पौर्णिमेला भरणाऱ्या यात्रेत भाविक देवी दर्शनासाठी मोठ्या प्रमाणात येत असतात , नवरात्रोत्सवात विविध धार्मिक कार्यक्रमाबरोबरच महिला किर्तनकारांचा किर्तन सोहळ्याचे आयोजन केले असल्याची माहीती देवी मंदीर ट्रस्टच्या वतीने देण्यात आली आहे. बीड व नगर जिल्ह्याच्या सरहद्दीवर असणाऱ्या शेवगाव तालुक्याच्या बालमटाकळी येथे देवीची भव्य दिव्य अशी शोभनीय अशी वास्तु दिमाखात उभी आहे, ही वास्तु भाविकांचे लक्ष वेधून घेते, बालंबिका देवीची महती व जाज्वल्य पाहता देवीची ख्याती ही दूरवर पसरलेली आहे , नवसाला पावणारी व हाकेला धावणारी अशी भाविकांची श्रद्धा आहे. देवीच्या दर्शनासाठी भाविकांची मोठी गर्दी होत असते, मंदिरापुढील एका बारवेतून देवीचा जन्म झाला आहे. दगडी पाषाणाचा शोभनिय तांदळा घेऊन देवीची मूर्ती बाहेर आली, देवीचा तांदळा हा अर्धमुर्ती आहे, चार फुट उंच व तीन फूट रुंद आहे, तळहाता एवढे डोळे असून सुंदर चर्चित भाळी पिंपळा एवढे कुंकू आहे, देवीचा तांदळा हा दोन पदरी पातळाने झाकला जातो, मूर्तीची उत्तराभिमुख प्राणप्रतिष्ठा विधिवत करण्यात आली आहे. शेजारी परशुरामाची व गणपतीची प्रतिष्ठापना करण्यात आली आहे. दगडी पाषाणी दीपमाळ पौष पौर्णिमेला पाजळली जाते. देवीची महती व जाज्वल्य पाहता भाविकांची असणारी देवीची श्रद्धा यामुळे दरवर्षी तरुण भाविक पायी मशाल ज्योत आणण्यासाठी विविध ठिकाणी जात असतात , गेल्या अनेक वर्षापासून शंभराहून अधिक तरुण भाविक देवीच्या श्रद्धेपोटी नऊ दिवस उपास करून हातात काठी घेऊन मंदिरात चौफळा बांधून त्यावर विश्रांती घेतात तर महिला नवस्फूर्तीसाठी देवीच्या मंदिरात बसतात , मंदिरात सकाळ संध्याकाळी मोठी महाआरती होत असते या महाआरतीच्या वेळी प्रसाद म्हणून तांबूळ विडा व फराळ दिल्या जातो. दर्शनाला येणाऱ्या भाविक हे मोठ्या प्रमाणात देणगी स्वरूपात दान ही देतात तर ट्रस्टच्या वतीने त्यांचा सन्मान केला जातो. देवी मंदीराचे भव्यदिव्य अशा वास्तुमुळे गावच्या विकासात मोठी भर पडली असुन मंदिराचे सभागृहाचे भव्य असे काम माजी केंद्रीय मंत्री दिवंगत दिलीपजी गांधी यांनी तर घोडनदी शिरुरचे प्रकाशशेठ माणिकचंदजी धाडीवाल यांनी देखील मंदिराच्या गाभाऱ्यासह कळसाचे व मंदिराचे दुमजली असे भव्य काम करण्यात आले. देवी मंदिर ट्रस्टचे उपसरपंच तुषारभाऊ वैद्य , कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती रामनाथजी राजपुरे, ज्ञानेश्वर कारखान्याचे,संचालक मोहनरावजी देशमुख ज्ञानेश्वरचे संचालक चंद्रकांत पाटील गरड , केदारेश्वरचे मा, संचालक सुदामराव शिंदे, भाऊसाहेब बामदळे, अशोकशेठ छाजेड, धनंजय देशमुख, बाळासाहेब मोरे आदींसह ग्रामस्थ आरतीसाठी मोठ्या संख्येने उपस्थित असतात.



## महत्त्व हिरव्या रंगाचे

आधुनिक केसरी न्यूज

**आई अंबिकेची भरते खणा नारळाने ओटी देते हिरवा चुडा करी हिरवी पैठणी जरीकाठी..** अश्विन महिन्यात येणारा आदिशक्तीचा नवरात्रोत्सव आपण साजरा करत आहोत.या सुरू असलेल्या जगदंबा नवरात्र महोत्सवात यंदा सहाव्या दिवशी म्हणजेच सहाव्या माळेला हिरव्या रंगाच्या साजाचा आदिमातेला शृंगार चढवला जाणार आहे.म्हणजे या काळात येणारे सगळे भक्त आई जगदंबेला हिरवा चुडा, हिरवीगार साडी सर्वजण मनोभावे अर्पण करतात.पण हिरव्या रंगाला येवढे का महत्त्व दिले जाते हे मात्र पहाण्याची तसदी फार थोडेजण घेतात. कुणाला विचारलं तर सौभाग्याच लेणं आहे म्हणून हिरव्या रंगाला महत्त्व आहे असे उत्तर मिळते.पण आपण मला एक सांगा ह्या उत्तराने आपलं खरंच समाधान होतं? नाही ना... तर आज आपण त्या विषयी थोडं माहिती करून घेऊया. हिरवा रंग हा नव निर्मितीच प्रतिक मानला जातो. धरणीच्या कुशीतून रुजलेल्या बीयाणातून कोंब फुटून वर येतो तो हिरवा असतो.ग्रिष्माच्या झळा सोसून पानगळ झाली तर बघवत नाही पण वर्षा ऋतूच्या आगमनाने हिरवीगार झालेली वसुंधरा मनाला भुरळ घालते,सुखावते. कारण जुनी मरगळ जाऊन नवनिर्मिती झालेली असते.

आपल्याकडे त्याच कारणाने मुलगी मोठी,कळती झाली की तिची हिरवी साडी, हिरव्या बांगड्या देऊन ओटी भरतात.पुर्वी मुलींचे विवाह लवकर होत होते आणि म्हणून मुलीला नहाण आलं म्हणजे ती पूर्ण स्त्री झाली वंशवृध्दी करण्यास सक्षम झाली.म्हणून या वेळी हिरव्या रंगाला महत्त्व दिलं जाते.

लग्नविधीत फलशोभन या धार्मिक विधीलाही तेवढेच महत्त्व दिले जाते.दोन जीवांचे मधुर मिलन होऊन त्या रात्री पासून गृहस्थाश्रमातील गोड पर्वाची मुहुर्तमेढ रोवली जाते.यावेळी सुध्दा वधूला हिरवा साज चढवून शृंगार केला जातो.

जेंव्हा स्त्री गर्भवती असते तेंव्हा तीला हिरवी साडी, हिरव्या बांगड्या भरुन चोळी घातली जाते,डोहाळेजेवण केले जाते. नव निर्मितीचे प्रतिकात्मक म्हणून हिरव्या रंगाकडे पाहिले जाते. या शिवाय हिरवा रंग हा शांततेच प्रतिक मानला जातो म्हणून त्याला आपल्या भारताच्या तिरंगा ध्वजात स्थान आहे, मान आहे. हिरवा रंग हे सौभाग्याच लेण आहे म्हणून विधवा स्त्रीने हिरवे वस्त्र परिधान करायचे नाहीत,हातात हिरवा चुडा भरायचा नाही असा नियम आहे,आणि हा नियम घरातले, आजूबाजूचे लोक अगदी काटेकोरपणे तिला पाळायला लावतात.कारण विचारलं तर येवढंच उत्तर मिळत हिरवा रंग सौभाग्याचं लेण आहे म्हणून विधवा स्त्रीने हिरवा रंग वापरणे निशीध्द आहे, आपल्या धर्मशास्त्रात तसेच सांगितले आहे.धर्म शास्त्रात तसे सांगितले आहे हे मलाही माहीत आहे आणि मान्यही आहे.हा घातलेला नियम बरोबरही आहे पण हा नियम का घातला गेला असावा किंवा घातला गेला आहे हा प्रश्न खरंच कुणाला का पडत नाही? खरंच ह्याच्या मुळाशी जाण्याची तसदी कोणीच कसंकाय घेत नाही? हिरवा रंग नवनिर्मितीचे प्रतीक आहे आणि स्त्री नवनिर्मितीचा स्त्रोत आहे.ही आहे स्त्रीच्या जीवनातील हिरव्या रंगाची महती,आणि हे आहे कुठल्याही शुभ कार्यातील स्त्रीच्या जीवनातले हिरव्या रंगाचे महत्त्व.असं मलातरी वाटतं, तुम्हाला काय वाटतं किंवा या पेक्षा दुसरं कोणतं कारणं असेल तर मला जरूर सांगा. आई राजा उदो उदो बोल भवानी की जय.

ज्योती जयंतराव आळंदकर
लातूर




महाराष्ट्र Business Katta












# शेतकऱ्यांना नागवणाऱ्या अराजक व्यवस्थेविरुद्ध विद्रोह करणारी ग्रामीण कविता : माही गोधडी छप्पन भोकी

## || मंथनाचे पैलू ||





डॉ. धोंडोपंत मानवतकर
संपर्क क्र. 9890827414

लेखांक : ३३

मराठी ग्रामीण कवितेच्या प्रांतात आपली वेगळी विद्रोही पाऊलवाट निर्माण करणारे कवी ललित अधाने यांचा "माही गोधडी छप्पन भोकी" हा दुसरा कवितासंग्रह 'कुणबी बाप' या संग्रहानंतर तब्बल वीस वर्षांने काव्यप्रांतात दाखल झाला आहे. 'माही गोधडी छप्पन भोकी' संग्रहातील कविता वेगळ्या धाटणीच्या असून ह्या संग्रहातील समग्र  कवितेतून शोषणकारी अराजक व्यवस्थेविरुद्ध आक्रोश आणि विद्रोह दिसून येतो. मध्ययुगीन कालातील विद्रोही कवी संत तुकारामानंतर अठराव्या शतकातील विद्रोही कवी महात्मा जोतीराव फुले, आणि आधुनिक काळातील कवी नामदेव ढसाळ, राजा ढाले, ज.वि.पवार, बाबुराव बागुल, वामन निंबाळकर यांच्या कवितेच्या जातकुळीची कविता कवी ललित अधाने यांची आहे. ही कविता शेतकऱ्यांचा कैवार घेऊन विषमतावादी व्यवस्थेविरुद्ध परखड भाष्य करते.
आतापर्यंत ग्रामीण कवींच्या कवितेतून शेती आणि शेतकऱ्यांचे फक्त प्रश्न उपस्थित केले गेले आहेत किंवा शेतकऱ्यांचे गाऱ्हाणे नोंदवले आहे; मात्र कवी ललित अधाने यांच्या कवितेने शेतकऱ्यांना नागवणाऱ्या अराजक व्यवस्थेचे वाभाडे काढले आहे. याहीपुढे तिची मजल व्यवस्थेला लाखोली वाहण्यापर्यंत जाते. ललित अधाने यांची कविता कोणताही मुलाहिजा न बाळगता विद्यमान सत्ताधाऱ्यांच्या खोटारड्या आणि भूलव्या भूमिकेवर निर्भयपणे व्वार करते.
महात्मा फुले यांनी त्यांच्या अखंडादि काव्यरचनेमधून तत्कालीन शेतकऱ्यांचे प्रश्न, त्यांचे दारिद्र्य, उपासमार, सावकारांकडून आणि प्रशासनाकडून होणारी आर्थिक लूट, होणारा छळ, निर्भयपणे, प्रामाणिकपणे व विद्रोहीरूपाने मांडला आहे. आज शेती आणि शेतकऱ्यांचे प्रश्न तेच आहेत फक्त स्वरूप बदलले आहे. महात्मा फुलेनंतरच्या काळात आजपर्यंत अशा प्रकारची निर्भयपणे वास्तव मांडणी करणारी, शेतकऱ्यांचा कैवार घेणारी कविता कवी ललित अधाने यांच्या संग्रहात दिसून येते.   ती शेतकऱ्यांच्या संघर्षासंदर्भात सत्ताधाऱ्यांना निरुत्तर करणारा सवाल करते.

**कुणी म्हणती साले**
**कुणी म्हणती फुकटे**
**आम्ही करतो संप तुमची काहून दुखते**
**( तुमची काहून दुखते पृ.३५)**

साले आणि फुकटे म्हणणाऱ्या विरुद्ध कवी समग्र शेतकरी बांधवाना पेटवतो...

"मी मेलो म्हुण रडत बसू नगा
संधी मिळाली की,
शासनाच्या तोंडावर हागा" (स्वप्न पडलं- पृ.१२२ )


शेतकऱ्यांनी अनेक मोर्चे काढले,आंदोलनं केली.आंदोलनात बरेच शेतकरी बळी गेले. अनेकांनी आत्महत्या केल्या. शेतकऱ्यांचे कर्ज माफ होत नाही, कधी पाऊसकाळ चांगला नसतो. कधी अतिवृष्टीने पिकांची माती होते. कधी पीके चांगली आली तर भाव नसतो. आडते अडवणूक करतात. वेळेवर पैसा मिळत नाही, लेकीबाळीच्या लग्नाचे प्रश्न, मुलांच्या शिक्षणाचे प्रश्न अशा सर्व बाजुंनी मेटाकुटीला आलेल्या शेतकऱ्याच्या मनात धगधगणारी आग, त्याचा आक्रोश, व त्याचे प्रश्न सोडविण्याचे आश्वासन देणारा नेता आणि नेत्याला काहीतरी मिळालं की, तो एखाद्या पक्षाचा गुलाम होऊन बसतो. शेती, माती, शेतकरी बाप हे सगळं तो विसरून जातो. मात्र या सर्वांची नोंद घेऊन न्याय देण्यासाठी पेनाचं हत्यार करून प्रतिनिधित्व करणारे कवी ललित अधाने हे सामाजिक वास्तवाला चव्हाट्यावर आणून राजकीय विकृती व विषमतावादी व्यवस्थेविरुद्ध एल्गार पुकारतात. त्यांची कविता क्रांतीची मशाल होऊन पुढे येते आणि टोकाचा विद्रोह करते. समग्र कुणबी बांधवांचा कैवार घेत स्वतःवर उदार होऊन कवी म्हणतो..मी मेलो म्हणून रडत बसू नका, जेव्हा जेव्हा संधी मिळेल तेव्हा शासनाला वेठीस धरा..शेतकऱ्यांच्या विराट आंदोलनाला हाणून पाडणाऱ्या अनेक घटना शेतकऱ्यांसह सामान्य जनतेच्या काळजात सतत धगधगत आहेत. त्या विविध घटनांचा हा कवितासंग्रह दस्तऐवज आहे. 'माही गोधडी छप्पन भोकी' हे या कविता संग्रहाचे शीर्षकसुद्धा छप्पन इंचाच्या छातीवरून आले असावे; जनतेला, शेतकऱ्याला नागवण्यासाठी छप्पन इंच छातीची गरज असेल तर आमच्या दारिद्र्याला अगोदरच छप्पन भोकं पडलेले आहेत. ही छप्पन भोकी दारिद्र्याची गोधडी शिवता शिवता आमच्या आधीच नाकी नऊ आलेले आहेत. असे असतांना तुमच्या अनैतिक राजकारणाच्या कारस्थानाला जनता आणि शेतकरी बळी पडतो आहे. ही कारस्थानं थांबत नाहीयेत.. उलट वाढत चालली आहेत. सत्ताधाऱ्यांच्या खोटारड्या कारस्थानाचा राग कवीच्या मनात धुमसत आहे... यातूनच ही विद्रोही कविता जन्म घेते आणि थेट सत्ताधाऱ्यांशी भिडते. 'ही आग धडाला नाही' (पृ.४७) या कवितेत कवी राजकारण्यांच्या अनैतिकतेवरच प्रहार करतात....

**भाषणात तत्व**
**कृतीने कसाई**
**तोंडापुरते**
**दादा भाई...**
**गोड बोलून**
**मारायची गांड**
**उधळत खिदळत**
**हिंडतात सांड** (पृ.४७)

भाषणात तत्वाच्या गोष्टी करणारे, स्वतःला दादा,भाई म्हणवून घेणारे कसायासारखे वागतात. पक्षाची लाचारी करत गोड बोलून जनतेची फसवणूक करतात अशा सांडांबद्दल कवीच्या मनात चीड आहे.
कवी ललित अधाने यांच्या कवितेने वर्तमान वास्तव निर्भयपणे व प्रामाणिकपणे रेखाटले आहे. कवी हा निस्वार्थी, सत्यवादी, प्रामाणिक, निर्भय असतो म्हणून तो  जनतेचं शोषण करणाऱ्या खोटारड्या,फसव्या,कारस्थानी लोकांच्या विरोधात बोलत असतो. सध्या देश चालवणारांची नीती चांगली नाही, म्हणून सगळीकडे अराजकता निर्माण करणाऱ्या सरकारला कवी धारेवर धरतात, ते म्हणतात...

**धृतराष्ट्रासारखी**
**आंधळी तुमची नजर**
**देशविदेशात तुम्ही**
**दाखवून राहिले गाजर**
**किती दिवसापासून तुम्ही**
**अभ्यास करून राहिले ?**
**कोणते द्रोणाचार्य**
**तुम्हां गुरु म्हणून गावले ?**
**द्रौपदीचं वस्त्रहरण**
**करणं तुम्ही सोडा**
**लोक लावतील निवडणूकीत**
**मतदानाचा घोडा**
**रोज रोज नव्या पुड्या**
**काहून तुम्ही सोडते**
**आम्ही करतो संप तुमची काहून दुखते**
**( पृ.३६)**

सदरहु कवितेतून कवीने सरळ सरळ केंद्रातल्या नेतृत्वाच्या बेगडी कामकाजावर हल्ला केलेला आहे.'तुमची काहून दुखते' या कवितेतून पुजाऱ्यांसह दगडधोंड्याच्या देवाचा समाचार घेतला आहे.
देशविदेशाचा भारत हा विश्वगुरू बनणार म्हणे! देशात द्रौपदीचं वस्त्रहरण होताना दुर्लक्ष करणारे तुम्ही. ही बेगडी वृत्ती सोडून द्या ! पुड्या सोडणं म्हणजे प्रत्येक भाषणात खोटं बोलणं सोडून द्या ! गायीमध्येच तेहतीस कोटी देव असतील तर शेळ्या, मेंढ्यात, कोंबड्यात किंवा म्हैसीमध्ये का भूतं असतात का? देव गायीतच कसा शिरला आणि तो फक्त तुम्हालाच कसा दिसतो. गायीमध्ये तेहतीस कोटी देव दिसणारांनी दुष्काळात भाकड गायी पाळून पहाव्यात. अशा निरुत्तर करणाऱ्या अनेक प्रश्नांची सरबती सदरहु कवितेत आहे. जनतेला खोटं बोलणं, जनतेसोबत कारस्थान करून शोषण करणं सोडून द्या ! नाहीतर भारतीय जनता येणाऱ्या निवडणूकीत घोडा लावेल. म्हणजे विकृत लोकांना सत्तेवरून पायउतार करेल असा निर्वाळा कवी आपल्या कवितेतून देतात.
या संग्रहात मराठवाडी बोलीतील ग्रामीण शब्दांचा वापर अधिक्याने दिसून येतो. संग्रहाचे शीर्षकच ग्रामीण बोलीतील आहे. वरवर ते शीर्षक शिवी असल्यासारखे वाटत असले, तरी त्या शीर्षकातून फार मोठा आशय व्यक्त झालेला आहे. ग्रामीण भाषेत गरीबी, दारिद्र्य, यासाठी विशेष वाक्प्रचार आहेत, जसे-'बारा गाड्या गरीबी, 'गरीबी




पाचवीलाच पुंजलेली आहे', 'गरीबी पाठ सोडत नाही. एखाद्या ग्रामीण माणसाच्या तोंडून 'दलिंदर वाणाचं, किंवा 'भिकारचोट', 'भिकारबदग्या', 'दलिंदर भोक्या', अशा सहज आलेल्या ह्या शिव्याच गोरगरिबांच्या परिस्थितीची विशेषणं झाली. त्याचप्रमाणे कवीला प्रातिनिधिक स्वरुपात 'माही गोधडी छप्पन भोकी" हे समाजाच्या दारिद्र्याचं स्वरूप शासनकर्त्यांच्या लक्षात आणून द्यायचं आहे. राज्यकर्त्यांच्या मेंदूवर कोरून राहिल असं हे शीर्षक आहे. शासनकर्त्यांच्या अनैतिकतेचा व निर्लज्जपणाचा समाचार घेऊन शेवटी शीर्षकाची अर्थभूमी उजागर करताना कवी लिहितात...

**ग्लोबल दौरे ग्लोबल भवरे**
**ग्लोबल नारीला सतरा नवरे**
**अंगावर कोट खिशात नोट**
**गुदगुल्या करायला हजार बोटं**
**दुसऱ्याची दुलई कशाला पाहू**
**माही गोधडी छप्पन भोकी || (खाकी-पृ.४२)**

देशातल्या गरीब श्रीमंतीच्या तफावतीचं विदारक वास्तव  अधोरेखित करतांना कवीचा रोष आहे तो इथल्या विषमतावादी शोषण व्यवस्थेविरुद्ध. कवीच नव्हे ,तर लहान लहान बालकेसुद्धा वर्तमानकालीन सत्ताधाऱ्यांना शिव्या देताहेत. योजनांच्या नुसत्या खोट्या जाहिराती, आश्वासने, घोषणा म्हणजे नुसत्या बड्या बड्या बाता. कवीच्या भाषेत  "बोल बोल बाता अन् ढुंग खाय लाथा "  किंवा  लोकांना आशेची देऊन गुंगी गारुडी वाजवतो गाजराची पुंगी (पृ.४३) कवितेच्या दुसऱ्या विभागाचे शीर्षककाव्य **'झ्याट मारी झिंगा'**

**कुणीतरी गाढव समजून**
**पाठीवरती लादतं ओझं**
**बेगडी ही चमक सारी**
**आपण म्हणतो माझं माझं**
**तो साला मागून पुढून**
**आपली फक्त मारून जातो**
**झाला वापर करून की,**
**कंडोमसारखा फेकून देतो**
**आता असं रडायचं न्हाई**
**मनातल्या मनात कुढायचं न्हाई**
**झ्याट मारी झिंगा**
**लवड्याला पिंगा (पृ.७७/७८)**

कवी ललित अधाने यांच्या कवितेतून सामान्य माणसाला कशाप्रकारे कोंडीत पकडले जाते. कशाप्रकारे त्याचा वापर करून घेतला जातो. व त्याला कसे गरीबच ठेवले जाते अशाप्रकारचं जिणं कवी झुगारून द्यायला सांगतो. सामान्य माणसासह जगाचा पोशिंदा असलेल्या शेतकऱ्याची वेगवेगळ्या प्रकारे कोंडी करून त्याला नागवण्याचे काम वर्षानुवर्षे चालूच आहे. त्या  सत्ताधाऱ्यांविरुद्ध, व्यापाऱ्यांविरुदध, ढोंगी पाखंड्या विरुद्ध,अंधश्रध्देविरुद्ध असणारा कमालीचा उद्वेग  दिसून येतो. त्यांची कविता ढोंगी,पाखंडी, शोषण परंपरेचे आणि कर्मकांडाधिष्ठित धर्मसत्तेचेसुद्धा वाभाडे काढते..प्राक्तनाची लक्तरे या कवितेत कवी लिहितात,

**आता परंपरेचा प्रणेता**
**भूदेव**
**माजाडून टाकतो गाव**
**व्रतवैकल्ये सत्यनारायण**
**अभिषेकाच्या नावाखाली**
**आम्ही मात्र**
**नारायण नागबळी**
**ठरत जातो वाळवंटात**
**परंपरेच्या छिनाल कुंभमेळ्यात**
**घटाघटा पितोय**
**मूत्र-विष्ठा तीर्थ म्हणून**
**तरी पत्थरांच्या देवतांनाही**
**फुटत नाही पाझर**
**माझ्या काळ्या रानाला**
**किरळ लागली म्हणून. ( पृ.८२)**

अर्थात कवीला हे बळ फुले, शाहू, आंबेडकरी विचारधारेने व लोकशाही स्वातंत्र्याने दिले आहे. म्हणून शब्दांदोलनाचं बिगूल वाजवून अजागरूक समाजबांधवांना जागे करण्याचे काम कवी करत आहे. कवी ललित अधाने यांची कविता  लयीत,तालासुरात; परंतु गावरान शब्दात व्यवस्थेला लाखोली वाहते. कवीला ताललयींची सांगितिक जाण आहे, त्याहीपेक्षा  सामाजिक प्रश्नांचे अधिक भान आहे;  म्हणून कवी अधाने यांची कविता तलम,रेशमी आणि सुगंधी शब्दांच्या परिघात अडकून बसत नाही, ती समाजातील प्रत्येक विकृतीला,विषमतेला, राजकीय ढोंगाला चव्हाटयावर आणते.

**हा कोणता नवा कायदा**
**ही कोणती नवी नीती**
**तुमच्यात झाला सामील**
**की पळून जाते भीती**
**अमृतमहोत्सव (पृ.१६०)**

कवी निर्भय झाल्याशिवाय सत्ताधाऱ्यांचे दोष दाखवता येत नाही...

**आम्ही बोलू नये म्हणून**
**शब्दांवर घालता बंदी**
**आम्ही सापडावेत तावडीत**
**म्हणून शोधत असता नवी संधी**
**(पृ.१६०)**

प्रस्तुत संग्रहात कवितेचे बिगुल, झ्याट मारी झिंगा, एन-ए लेआऊट आणि दुःखाच्या ऐरणीवर. असे चार विभाग आहेत. संग्रहातील कवितेतून बळीवंतांच्या सोशिक जिंदगीचा लेखाजोखा मांडला आहे.  विस्तार भयास्तव प्रत्येक कवितेवर भाष्य करणे शक्य नाही. ललित अधाने यांची समग्र कविता माणूसकेंद्री आहे. ती सामान्य माणसाच्या प्रश्नांसह, शेती, राजकारण, आरक्षण, सत्ताधाऱ्यांकडून होणारा छळ, शेतकरी आंदोलने,  शेतकरी कुटुंबाची होणारी वाताहत या सर्व वाताहतीच्या दुखऱ्या संवेदनांचा ती परामर्श घेते.

**'शेतमळ्यातील अंधार**
**खुरपून काढताना**
**किती जळाली असतील कॅलरीज?**
**किती जीवनसत्त्वाची दिली असेल**
**आहुती ? तेव्हा... कितीदा तरी लगडले**
**असतील द्राक्षांना आकांक्षांचे घोस'**
**(आहुती-१३२)**

या संग्रहातील कवितेत प्रतिमा आणि प्रतिकांचा शेतीविषयक नवा सृजनाविष्कार पहायला मिळतो, जसे - हायजॅक केलंय गावशिवार,  द्राक्षांना आकांक्षांचे घोस', 'अंधार खुरपून काढू', 'उत्साहाचा समुद्र', अनेक नव्या प्रतिमा आणि प्रतिकांबरोबरच ग्रामीण कृषीजीवनात येणारे दुर्मिळ शब्द, ग्रामसंस्कृतीत शेतीच्या नेहमी कामी पडणाऱ्या  औजारांची नांवे, जी कांही दशकांनी हद्पार होण्याची भीती वाटते. ग्रामीण कृषिवलांचे जीवन जगलेल्या कवीची कविता समाजवादी धोरणाची, सामाजिक समतेची अपेक्षा करते. म्हणून तिचा विद्रोह विषमतेच्या विरोधात आहे.
ग्रामीण कवितेच्या परिप्रेक्षातून 'माही गोधडी छप्पन भोकी' मधील ग्रामीण कवितेकडे पाहतांना या कवितेची भूमी आणि भूमिका विद्रोहीरूपाने आपले वेगळपण सिद्ध करताना दिसते. कवीच्या अनुभूतीला सहानुभूतीची जोड असली की, समाजमनाचा तळठाव घेऊन जीवनजाणिवांचे अंतरंग प्रतिबिंबीत करता येतात. वेगवेगळे विषय घेऊन लिहिलेली प्रत्येक कविता न वाचता पुढे जाताच येत नाही. अशी भूरळ घालणारी संग्रहातील एकूणच कविता दखलपात्र आहे.
पुणे येथील अक्षरवाङ्मय प्रकाशनाने प्रकाशित केलेल्या "माही गोधडी.... या संग्रहात एकूण ५६ दीर्घ कविता आहेत. ह्या सुंदर संग्रहातील कवितेची भलावण करणारी पाठराखण प्रा.आशुतोष पाटील यांची असून मराठी साहित्याचे अभ्यासक, समीक्षक प्रा.डॉ.कैलास अंभुरे यांची कवितेला न्याय देणारी प्रदीर्घ प्रस्तावना आहे. चित्रकार सरदार जाधव यांचे अमूर्त शैलीतील मनोवेधक व सूचक मुखपृष्ठ संग्रहाच्या सौंदर्यात भर घालते. कवी ललित अधाने यांच्या "माही गोधडी...मधील कवितेत दुर्मिळ, दुर्लक्षित, अस्सल ग्रामीण बोलीतील शब्दांच्या पुनर्वसनाने विद्रोहाला धार आली आहे. कवी ललित अधाने यांच्या अशाच आगामी काव्याकृतीसाठी मनःपूत शुभेच्छा..!

# महाराष्ट्राची आई तुळजाभवानी

आधुनिक केसरी



सुरज रामचंद्र अंगुले
संपर्क : ७७१९८७६३१३

महाराष्ट्रातील साडेतीन शक्तिपीठांपैकी श्री तुळजाभवानी देवीचे तुळजापूर क्षेत्र हे एक पूर्ण शक्तिपीठ आहे. ही देवी भगवती (भवानी) म्हणून प्रसिद्धआहे. महाराष्ट्र क्षात्र तेजाची स्फूर्तीदेवता, प्रेरणाशक्ती व स्वराज्य संस्थापकराजे श्री शिवछत्रपती यांचीआराध्यदेवता, अशी ही तुळजापूरची भवानीदेवी महाराष्ट्राची कुलस्वामीनी आहे. हे गाव बालाघाटच्या एका कड्यावर वसले आहे. एका कथेनुसार,कृतयुगात कर्दभ नावाचे तपोनिष्ठ ऋषी होऊन गेले. त्यांची पत्नी अनूभुती रुपसंपन्नअसून पतिव्रता होती. सुदैवाने तिला पुत्ररत्न प्राप्त झाले. परंतु त्यांचा सुखीसंसार फार काळ टिकला नाही. कारण कर्दभ ऋषींनी लवकरच इह्लोकीची यात्रा संपविल्यामुळे अनुभुतिने सति जाण्याचा निर्णय घेतला; परंतु अल्पवयीन पुत्राला मागे सोडून पतिसोबत सहगमन करू नये असे ऋषींनी शास्त्राचा आधार घेऊन सांगितले असता अनुभूतीने आपल्या पुत्राला गुरुगृही सोडुन ती मेरू पर्वता नजिक असलेल्या मंदाकिनी नदीच्या परिसरात गेली. आणी तिथे आश्रम बांधून तिने तपश्चर्या सुरू केली. तिची तपश्चर्या सुरू असताना कुकर नावाचा दैत्य तिच्या अप्रतिम सौंदर्यावर लूब्ध झाला. त्याच्या मनात पापवासना निर्माण होऊन त्याने तिला स्पर्श केला त्यामुळे तिची समाधी भंग पावली. दैत्याने काही अनुचित प्रकार करु नये म्हणून तिने आदिशक्तिचा धावा केला. यासाठी की शक्तीने या दैत्याच्या तावडीतून आपली सुट्का करावी आणी खरोखरच देवी भवानी मातेच्या रुपाने त्वरित धावून आली. तिने दैत्याशी युदध केले. दैत्यही महिषाचे रूप घेऊन आला. तेव्हा देविने त्रिशुळाने त्याचे शीर वेगळे केले. ही भवानी देवी वेळीच अनुभूतीच्या रक्षणासाठी त्वरित धावून आल्यामुळे तिला त्वरिता असे नाव पडले. कालांतराने त्वरिताचे-तुरजाव त्याचे पुढे तुळजा होऊन तुळजापूर झाले.



# पडद्यावरील मद्यपी पण आयुष्यात दारूच्या थेंबालाही स्पर्श नाही...

आधुनिक केसरी

**एखाद्याला रडविणे सोपे आहे पण हसविणे तितकेच अवघड ! भूतपूर्व काळात असेच एक हास्य अभिनेते होऊन गेले. त्यांचे पडद्यावर आगमन होण्याचाच अवकाश की प्रेक्षकांच्या ओठी नकळतच हसू फुटे आणि सारे सारे चित्रपटगृह हास्यरसात बुडून जाई. त्यांना विनोदाचे इतके भान असायचे, की त्यांचा तो अभिनय पाहून प्रेक्षक चाट पडत असत. मद्याला स्पर्शही न करताही मद्यपि व्यक्तीचा त्यांनी केलेला बेमालूम अभिनय पाहून लोकांचा आपल्या डोळ्यांवर विश्वासच बसत नसे, की स्वत: दारू न पिता पडद्यावर ते अस्सल दारुडा कसा काय उभा करीत असतील !**

चित्रपटक्षेत्रात प्रवेश करण्यापूर्वी हा अभिनेता नकला, विडंबन करून लोकांना हसवीत असे. त्यानंतर त्याने चित्रपटसृष्टीत आपले नशीब अजमावून पाहण्याचे ठरविले आणि एका निर्मात्याकडे जाऊन त्याने मद्यपि माणसाचा असा काही अभिनय केला, की त्याच्यासाठी चित्रपटसृष्टीची दारे कायमची उघडली गेली. आयुष्यात दारूच्या थेंबालाही स्पर्श न केलेल्या पण आपल्या हास्य निर्माण करणाऱ्या अभिनयाने लोकांचे भरपूर मनोरंजन केलेल्या या अभिनेत्याचे नाव `जॉनी वॉकर'.

बदरुद्दिन जमालुद्दिन काझी ऊर्फ जॉनी वॉकर यांचा जन्म ११ नोव्हेंबर, १९२६ या दिवशी मध्य प्रदेशमधील (त्यावेळी मध्य भारत) इंदूर शहरात झाला. त्यांचे वडील एका गिरणीत कामाला होते. ती गिरणी अचानक बंद पडल्याने त्यांचे संपूर्ण कुटुंब उदरनिर्वाहासाठी मुंबईला आले. एका मोठ्या कुटुंबाचा उदरनिर्वाह चालविणे सोपे नव्हते. म्हणून जॉनी वॉकर यांनी लहान सहान कामे करणे सुरू केले. काम कोणतेही मिळो त्यांनी ते विनातक्रार केले. कधी फळे विकली तर कधी भाजी, कधी आइस्क्रीम तर कधी स्टेशनरी ! दिवसा मागून दिवस असेच जात होते आणि एके दिवशी `बीईएसटी'मधे (बॉम्बे इलेक्ट्रिक सप्लाय अंड ट्रान्सपोर्ट : `बेस्ट') त्यांना बसवाहकाची (कंडक्टर) नोकरी मिळाली. कामावर असताना नकला, विडंबन करून ते बसमधील उतारूंचे मनोरंजन करीत. बसवाहकाची नोकरी करीत असतानाच इतरही कामांमधे आपले नशीब अजमावून बघणाऱ्या जॉनी वॉकर यांचा खरा ओढा मात्र चित्रपटाकडेच होता. रुपेरी पडद्यावर चमकून प्रेक्षकांचे भरपूर मनोरंजन करण्याची त्यांची सुप्त इच्छा होती. अखेर परमेश्वराने त्यांची ही इच्छा पूर्ण केली.



ती पूर्ण व्हावी म्हणून अभिनेते बलराज साहनी यांनी त्यांना बरीच मदत केली. बसवाहकाच्या नोकरीबरोबरच जॉनी वॉकर यांना चित्रपटात लहान-मोठ्या भूमिका मिळू लागल्या. असेच `हलचल' या चित्रपटाचे चित्रीकरण सुरू असताना त्यात तुरुंगाधिकाऱ्याची भूमिका करणारे अभिनेते बलराज साहनी यांची नजर गर्दीत उभ्या असलेल्या जॉनी वॉकर यांच्यावर पडली. दुपारच्या उपाहाराच्या वेळी सेटवर उपस्थित असणाऱ्या कलावंतांचे ते नकला करून मनोरंजन करीत होते. जॉनी वॉकर यांच्यात लपलेले अभिनयाचे गुण बलराज साहनी यांनी हेरले आणि त्यांना एखाद्या चित्रपटात संधी देण्याचे आश्वासन दिले. पण त्यानंतर खास असे काही घडले नाही. त्यामुळे जॉनी वॉकर यांची बलराज साहनी यांच्याशी जेव्हा जेव्हा भेट होई तेव्हा तेव्हा ते त्यांना त्या आश्वासनाचे स्मरण करून देत. काही दिवसांतच बलराज साहनी यांच्याकडे `नवकेतन'च्या `बाजी' या चित्रपटाची पटकथा लिहिण्याचे काम आले. ते पटकथेवर काम करीत होते आणि लिहिता लिहिता त्यांनी जॉनी वॉकर यांच्यासाठीही एक व्यक्तिरेखा लिहिली. ती एका मद्यपि माणसाची होती. व्यक्तिरेखा तर लिहिली गेली पण `बाजी'चे निर्माते व नायक देव आनंद आणि दिग्दर्शक गुरु दत्त यांच्याशी बदरुद्दिनची गाठ कशी घालून द्यावयाची हा प्रश्न बलराज साहनी यांच्यापुढे उभा राहिला. तेवढ्यात त्यांना एक युक्ती सुचली. त्यांनी बदरुद्दिनला काही तरी सांगून देव आनंद यांचे ज्येष्ठ बंधू अभिनेते चेतन आनंद यांच्या कार्यालयात पाठवून दिले. त्या ठिकाणी चेतन आनंद यांच्याबरोबर देव आनंद आणि गुरु दत्त `बाजी'वर चर्चा करीत होते. तेवढ्यात कार्यालयाच्या बाहेर लोकांचा गलका ऐकू आला. चौकशीअंती समजले, की कोणीतरी दारुड्या कार्यालयात घुसला आहे. थोड्या वेळाने तो दारुड्या चक्क केबिनमधे गेला आणि गमती जमती करून त्या ठिकाणी असलेल्या लोकांचे मनोरंजन करू लागला. ते सगळे त्याचा आनंद घेत होते. हे सुरूच असताना आतून चेतन आनंद यांनी ओरडून सांगितले, की या माणसाला ताबडतोब बाहेर काढा. चेतन आनंद असे सांगत असतानाच बलराज साहनी त्या ठिकाणी उपस्थित झाले आणि चेतन आनंद यांना म्हणाले, की मीच बदरुद्दिनला हे सोंग वठविण्यास सांगितले होते म्हणजे आपण सगळे त्याच्या अभिनयाचे कौशल्य पाहू शकाल. बदरुद्दिनने दारू न पिताही केलेला दारुड्याचा अभिनय पाहून चेतन आनंद, देव आनंद आणि गुरु दत्त सारे कमालीचे चकित झाले. मद्यपि माणसाचा अभिनय पाहून अतिशय प्रभावी झालेल्या चेतन आनंद यांनी `जॉनी वॉकर' या प्रसिद्ध मद्याच्या ब्रंडच्या नावावरून बदरुद्दिनचे `जॉनी वॉकर' हे चित्रपटासाठी नवे नामकरण करून `बाजी'मधे मद्यपि माणसाची भूमिकाही दिली. `बाजी' प्रदर्शित झाला आणि त्याने जॉनी वॉकर यांना मोठी लोकप्रियता मिळवून दिली. त्यांच्या चित्रपटाच्या कारकिर्दीची गाडी वेगाने धावू लागली. त्यानंतर त्यांनी पुन्हा मागे वळून पाहिले नाही.

अनिल रा. तोरणे,
९२२६१६०६५४)

# संघर्षाचा आनंद लुटता आला तर सफलता लोटांगण घेईल



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

आधुनिक केसरी

**जीवनातील संघर्षाचं गणित हे यशस्वी पद्धतीने सोडवता आल पाहिजे. संघर्षाला घाबरण व्यर्थ आहे. उलट संघर्षाचा आनंद लुटता आला पाहिजे हा आनंद जर लुटता आला तर सफलता लोटांगण घेतल्या शिवाय राहणार नाही. संघर्ष हा कधीच कोणाला संपविण्यासाठी आलेला नसतो पण त्याला आपण कसं घेतो त्या नुसार परिणाम ठरतात आपण नकारात्मक घेतलं तर प्रचंड नुकसान होत आणि सकारात्मक घेता आलं तर उत्कर्ष होतो. आपण संघर्षाला नकारात्मक घेतो म्हणून मुळात गडबड होते. संघर्ष हा कोणाच्याही वाट्याला येत नाही. आपली क्षमता तपासूनच निसर्ग ही संधी आपल्याला बहाल करत असतो. पण हि संधी आपल्याला वेळीच हेरता आली पाहिजे.**

संघर्षाचे संधीत यशस्वी रूपांतर करून त्याला यशात परिवर्तित करता आलं पाहिजे.हेच वास्तविक खडतर जीवन आहे. संघर्ष हे निसर्गाचे आमंत्रण आहे निसर्गाने बहाल केलेली संधी आहे ही संधी योग्य वेळी समजली पाहिजे आणि समजुन ती स्वीकारण्यासाठी सदैव सज्ज असल पाहिजे. संघर्ष हा तर धमन्यात सळसळला पाहिजे. संघर्षाची यशोगाथा हिच जीवनाची खरी फलनिष्पत्ती असते .जीवनात सहजपणे काही मिळालं तर त्याची यशोगाथा शौर्य गाथा निर्माण होत नाही. पण संघर्ष करत जर आपण काही मिळवलं तर मग मात्र एक यशोगाथा निर्माण होत असते.

म्हणून संघर्षाला घाबरण्याची आवश्यकता मुळीच नसते. संघर्ष ही निसर्गाने बहाल केलेली अद्वितीय संधी आहे. जीवन म्हटलं की वेगवेगळ्या टप्प्यांवर संकटं, वादळ, समस्या ह्या वारंवार नित्य येणार या मध्ये काही दुमत नाही. परंतु या संकटं काळात आपल्या कडील उपलब्ध ज्ञानाचा ब्रह्मास्त्र म्हणून वापर करता आला पाहिजे आणि संकटाला उत्तम संधीत परिवर्तित करता येण्याची कला क्षमता, शक्ति ताकद म्हणजे यशस्वी जीवन होय. यासाठी आवश्यक ते ज्ञान आपण जीवनाच्या विविध टप्प्यांवर आवश्यकतेनुसार अर्जित केले पाहिजे. विविध संकटं,वादळ, काठीण प्रसंग यांचा संगम म्हणजे जीवन. अखंड संघर्षाची मालिका हिच जीवनाची खरी ओळख असते. मुळात अडचण हिच आहे हे सर्व गणित समजलं पाहिजे. संकटाला उत्तम संधीत परिवर्तित करता येण्याची काला म्हणजे यशस्वी जीवन या शिवाय यशस्वी जीवन म्हणजे फार काही वेगळं नसतं. म्हणून वेळेवेळी येणार संकटं संधीत परिवर्तित करता आलं पाहिजे. वास्तविक निसर्गकडून आपल्याला घडविण्यासाठीच आपल्या समोर वेगवेगळी संकट अडचणी उभा राहत असतात. परंतु संकट, अडचणी, समस्या, वादळं ही आपल्याला अडविण्यासाठी दुःख देण्यासाठी आली आहेत असा आपण गैरसमज निर्माण करून घेतो पण असं कधीच होत नसत आपल्याला दुःखी कमजोर करणे हा निसर्गाचा हेतु कधीच नसतो. समस्या अडचण आपली आहे. आपण संकट,वादळ , समस्या यांना घाबरतो. दुःखी होतो खचुन जातो. म्हणून खरी समस्या इथंच आहे. न घाबरता न दुःखी होता न ताण, तणाव घेता त्याच बरोबर चिंता न करता जीवनातील कोणतंही संकट हे आपल्याला रडविण्यासाठी नाही तर सहाजिकच आपल्याला घडविण्यासाठी आलेलं आहे असं समजून त्याची मज्जा लूटली पाहिजे आनंद घेतला पाहिजे. हे समजणं खुप महत्वपूर्ण आहे. संकटाला निसर्गाचे निमंत्रण समजून ज्यांनी, ज्यांनी आपल्या जीवनात संकटाला उत्तम संधीत परिवर्तित केले. ते सर्व महामानव झाले यशस्वी झाले समाजासाठी आदर्श ठरले. आपण छोट्या छोट्या गोष्टी, समस्या, संकटं आल तरी तणाव घेतो. कारण ही खुप छोटी छोटी असतात.त्याच वास्तविक मुल्य काहीच नसतं. परंतु आपण ते समजूत घेत नाही.म्हणून गल्लत होते आणि आपल्या जीवनात दुःखाची उत्पत्ती होते. वास्तविक दुःख हे नाहीच मुळी आपल्या मन सारखी घटना घडली अथवा आपल्या मनाला



अनुकूल अस घडले, की आपण त्याला आनंद समजतो आणि मनाच्या विरूद्ध घटना घडली किंवा मनाला प्रति कुल अशी घटना घडली कि आपण दुःखी होऊन त्याला दुःख समजतो आणि खिन्न होऊन तणाव घेतो याला आपण दुःख समजतो. वास्तविक असं नाही संकटं समस्या अडचण हि प्रत्येकाला आहे आणि येणारच मात्र अडचण समस्या आणि संकट याच स्वरूप व्यक्ति परत्वे वेगळं असल तरी देखील विना संकटाच सृष्टीवर कोणीही नाही असणार देखिल नाही हे निश्चित आहे या मध्ये काही शंका कुशंका नाहीच. परंतु आपल्या कडे सगळ्यात महत्त्वाची गोष्ट ज्ञान साठा किती उपलब्ध आहे. यावरून त्या संकटाचा समाना करण्याची ताकद शक्ती क्षमता निर्धारीत होत असते. म्हणुन संकट मोठं आहे कि छोटं हे आपल्या ज्ञानावर ठरत. संकटाला निसर्गाचे निमंत्रण समजुन आपल्याकडील ज्ञानाचा ब्रह्मास म्हणून वापर करा .आणि संकाटाला उत्तम संधीत परिवर्तित करता आलं म्हणजे जीवन यशस्वी झाला संकटाचा आनंद लुटता आला पाहिजे हि कला कौशल्य जमलं तर जीवनात सफलता लोटांगण घेईल.

# मानवी जीवन हा पाण्यावरचा बुडबुडा



बुद्धभूषण चं. कांबळे
संपर्क क्र. 7498715661

आधुनिक केसरी

**मानवी जीवन हे आपल्याला निसर्गाने दिलेली अनमोल देणगी आहे. जीवनात आल्यावर जीवनाचा पुरेपूर आनंद घेणे हे आपले सगळ्यांचे आद्यकर्तव्य आहे. परंतू माणसाला जीवनात जर आनंद घ्यायचा असेल तर अगोदर अपयशाच्या वाटेने प्रवास करावाच लागतो. तेव्हा कूठे यशाचे गाव गवसते. तसेच माणसाला जीवन जगत असताना खूप खाचखळगे भेटतात. संकट व अडीअडचणी येतात. तेव्हा आपल्याला दूःखाला सामोरे जावेच लागते. म्हणून खचून न जाता काही दिवस निश्चिंत राहा परिस्थिती बदलेल. मागेपूढे का होईना आपणही दूःखातून बाहेर निघाल व सूखाच्या महासागरात न्हाऊन निघाला.**

सांगायचा मूद्दा काय तर सूख व दूःख हे एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत आणि या दोन्ही बाजूचा समतोल कसा ठेवायचा ते आपल्या प्रत्येकाच्या मानसिकतेवर अवलंबून आहे.जीवनात दूःख आले म्हणून खचून न जाता त्यावर हिंमतीने मात करुन सूखाला काबिज केले पाहिजे. आजकाल मानवी जीवन क्षणभंगूर झाले आहे. कोण कधी जाईल याचा काही नेमच राहीला नाही. मानवी जीवन पाण्यावरचा बुडबूडा बनले आहे. म्हणजे जीवनात जसे जन्माला आलो आहोत तसे एक ना एक दिवस जाणारच आहोत. म्हणून प्रत्येकाशी मैत्री करा व त्यांच्याशी मैत्री भावनेने वागा. विनाकारण कोणाशी वाद घालणे टाळा. इतरांच्या सूख दूःखात सहभागी व्हा.समाजकार्यात हिरीरीने भाग घ्या. विनाकारण कोणाला त्रास देऊ नका व कोणाशी बेईमानी करु नका. गरजवंतांना शक्य होईल तेवढी अर्थिक मदत करा. म्हणजे आपल्याला जीवन जगताना आनंद वाटेल. हे जीवन सुंदर आहे असे वाटेल. सध्या आत्महत्येचे सत्र सुरू आहे. कोणीही उठतोय व मानसिक ताण घेतोय आणि आत्महत्या करतोय. आपले लाखमोलाचे अनमोल जीवन संपवतोय. मानवी जीवन हे एकदाच मिळत असते. म्हणून मिळालेले मानवी जीवन मस्त मजेत जगा. असेही आपण किती दिवस जगणार आहोत.पण जवानपणीच का मरायचे. तसे तर जवानपणीच आजकाल लोक मरत आहेत. कारण व्यसनाचे प्रमाणात खूप वाढले आहे. ते वाईट व्यसन अगोदर बंद केले पाहिजे. कारण निर्व्यसनी राहाण्यातच खरी मजा आहे. हे आपण ओळखले पाहिजे. मिळालाय माणसाचा जन्म तर माणसासारखेच वागा.. आपल्या बरोबर इतरांचेही भले व्हावे ही मानसिकता ठेवा. लोकांना विनाकारण नावे ठेवणे बंद करा. कोणावर टिका टिप्पणी करणे बंद करा. कारण हे मानवी जीवन पाण्यावरचा बुडबूडा आहे. ते कधी फुटेल याचा नेम नसतो. म्हणून जीवन जगताना लोकांनी आपल्याला नेक व इमानदार म्हटले पाहिजे. मेल्यानंतरही आपल्या नावाचा गवगवा झाला पाहिजे. ते म्हणतात ना मरावे परी किर्तीरुपी उरावे. हीच मानसिकता आपल्या सर्वांची असली पाहिजे....

## सामाजिक निष्ठा आणि सर्वसमावेशक विश्वासू नेतृत्व

# अमित पाटील खडसे



आधुनिक केसरी

जीवन विकास शिक्षण संस्थेचे सचिव, तथा भर जहागीर जिल्हा परिषद सर्कलचे विद्यमान सदस्य आणि जिल्हा नियोजन समितीचे सदस्य,आदरणीय श्री.अमित भाऊ खडसे पाटील यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा..!

मित्रांनो, आज राजकारणातील दल बदलू काळात.. 'लोकशाही ' लोकप्रतिनिधीच्या स्वार्थपोटी धोक्यात येत आहे. समाजाला, देशाला लोकशाहीला अबाधित ठेवण्यासाठी आजचे नेते विश्वासू आणि निष्ठावान असणे ही काळाची गरज आहे. त्या पैकीचं रिसोड भागातील अतिशय प्रामाणिक सज्जन व्यक्तिमत्त्वाचे धनी म्हणजे श्री.अमित भाऊ पाटील खडसे हे आहेत. हे आमच्या स्वअनुभवातून आम्ही सांगतो आहे. येणाऱ्या भावी काळात नेता कसा असावा?यांचे ज्वलंत उदाहरण म्हणजे श्री. अमित भाऊ हे आहेत . समाजात पत आणि विश्वास असल्याशिवाय समाजात असे विश्वासू आणि एकनिष्ठ व्यक्तिमत्व उभे राहू शकत नाही. आणि टिकून सुद्धा राहू शकत नाही. खरोखर त्यांचा विचार आणि स्वभाव याचा एकनिष्ठ मिलाप म्हणजे खरोखर भाऊचे व्यक्तिमत्व आहे . त्यांचा स्वभाव म्हणजे.. " बोले तैसा चाले त्याची वंदावी..! पाऊले "असे खरोखर व्यक्तिमत्व असलेले रिसोड भागातील एकमेव व्यक्तिमत्व म्हणजे अमित भाऊ खडसे पाटील हे आहेत. खरोखर घरंदाज राजकीय वारसा असताना सुद्धा कधीही त्यांनी आपल्या राजकीय ओळखीचा गैरफायदा घेऊन कुणाचेही शोषण किंवा पिळवणूक केलेली नाही. कुठेही अरेरावीची भाषा केलेली नाही. हा स्वभावातील त्यांचा मनाचा मोठेपणाव संयमीपणा म्हणजे खूप मोठेपणाची बाब आहे. आजही सर्कल मध्ये स्वतः पैसे खर्च करून या भागातीलमधील जनतेची सेवा करण्याचा नित्यक्रम चालूच आहे. "आधी करावे,मग बोलावे "हे त्यांचे जनसेवा करण्याचे सूत्र आहे. त्यांच्या एकंदरीत प्रामाणिक अशा नेतृत्वाचा आणि कर्तुत्वाचा आढावा घेताना असे जनमत जाणवते की, येणाऱ्या भावी काळामध्ये ते रिसोड तालुक्यातील एक यशस्वी नेतृत्व उदयास आले आहेत. लोकशाहीला सच्चा आणि प्रामाणिक लोकप्रतिनिधी कसा असावा? यांचे ते एकमेव उदाहरण ठरणार आहेत.असी सर्वसामान्य जनतेची व समाजाची प्रबळ इच्छा आहे. कारण की आजच्या राजकारणातील बौद्धिक दिवाळखोरीची परंपरा बंद करायचे असेल तर, समाजकारणात आणि राजकारणात खंबीर प्रामाणिक नेतृत्व पुढे येणे व झळकणे ही काळाची व जनतेची प्रामाणिक इच्छा आहे. या विश्वासात खरोखर अमित भाऊ हे पात्र आहेत. हे नाकारून चालणार नाही. त्यांच्या जीवनात काळ आणि समाज त्यांना उभारी देऊन प्रगतीकडे वाटचाल करण्यासाठी समाजातून बळ मिळो. ही ईश्वरचरणी प्रार्थना करतो. उगवता सूर्य तुम्हाला प्रखर तेज देवो. निसर्गरम्य ही फुले तुमच्या आयुष्यात गंध भरो, अमित भाऊला सुख आणि समृद्धी लाभो... ही माफक माफक अपेक्षा करतो. माझ्या सर्व सहकारी मित्र मंडळातर्फे अशी उज्वल अपेक्षा करतो. त्यांना वाढदिवसाच्या खूप खूप शुभेच्छा...

**लेखन : रवि पाटील नरवाडे**
**राष्ट्रवादी युवक काँग्रेस, रिसोड तालुका**

# श्री शिवाजी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाचा कृषी अभ्यास दौरा

आधुनिक केसरी न्यूज



**रिसोड :** तालुक्यातील मोप येथील श्री शिवाजी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थी व विद्यार्थिनी यांचा कृषी विज्ञान केंद्र वाशिम अंतर्गत येत असलेल्या कृषी विज्ञान केंद्र करडा येथे कृषी अभ्यास दौऱ्याचे आयोजन करण्यात आले होते शाळेचे प्राचार्यव्हि.जी. मोरे, कनिष्ठ म. विद्यालयाचे पर्यवेक्षक एस.के.टेमधरे यांच्या मार्गदर्शनाखाली दिनांक 19 ऑक्टोबर रोजी सदर अभ्यास दौरा करण्यात आला होता.

कृषी विज्ञान केंद्र करडा हे वाशिम जिल्ह्यातील एकमेव कृषी विज्ञान केंद्र असून, भारतातील कृषी अनुसंधान नवी दिल्ली भारत सरकारच्या संलग्नित आहे. गेल्या 25 वर्षापासून कृषी क्षेत्रात आधुनिक विज्ञान व तंत्रज्ञान यांचा वापर, कसा करावा याबद्दल प्रशिक्षण व प्रात्यक्षिकाच्या माध्यमातून कार्य करीत आहे.

यावर्षी जिल्हा वार्षिक योजना 2022- 23 अंतर्गत नाविन्यपूर्ण योजना म्हणून शालेय विद्यालयातील विद्यार्थ्यांना कृषी क्षेत्राचे,कृषी तंत्रज्ञानाची माहिती व्हावी या उद्देशाने अभ्यास दौऱ्याचे आयोजन करण्यात आले होते. या स्तुत्य उपक्रमासाठी श्री शिवाजी कनिष्ठ विद्यालयातील प्राध्यापकांनी विशेष पुढाकार घेतला होता.सर्वप्रथम करडा कृषी विज्ञान केंद्र येथे छोटेखानी कार्यक्रमात विद्यार्थ्यांना कृषिविषयक मार्गदर्शन करण्यात आले. उखळकर प्रा.टेमधरे, प्रा.डॉ. वंजारे,कृषी शास्त्रज्ञ डॉ. रवींद्र काळे, तसेच श्री बावस्कर, यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आदित्य देशमुख यांनी तर आभार प्रमोद देशमुख यांनी मानले. यानंतर विविध कृषी विषयक विविध उपक्रमांना विद्यार्थ्यांनी भेट दिली. विविध उपक्रमाची माहिती घेतली. याच दरम्यान शाळेचे प्राचार्य व्ही.जी.मोरे, विज्ञान शिक्षक श्री जी.आर. खडसे, यांनी भेट देऊन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या कृषी अभ्यासदौऱ्यामध्ये तब्बल 130 विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. कृषी अभ्यास दौऱ्याच्या यशस्वीतेसाठी प्रा. टेमधरे, प्रा. जिवण हेंम्बाडे, प्रा. जया आदमने, प्रा. समाधान गायकवाड, प्रा. रमेश टाक, प्रा. विजय सोनुने, प्रा.प्रियंका हजारे, श्रीकिसन खरडे, शंतनु मोरे, रेखा करंगे, प्रिंयका बळकार यांनी परिश्रम घेतले.



# सापाला दिले जीवदान

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** धुळे शहरातील साक्री रोड येथे रामनगर परिसरातील जगताप यांच्या घराजवळ साप निघाला असा फोन आकाश सोनवणे यांना रात्री 10 च्या सुमारास आला त्यांनी तात्काळ तेथे धाव घेतली असता तेथे एक साप तारेच्या जाळ्यात अडकलेल्या अवस्तेत दिसून आला व काही तेथील लोकांनी भीतीच्या मार्गाने सापाला मारण्याचे देखील ठरवले परंतु आकाश सोनवणे तेथे पोहचल्यावर त्यांच्या मनाची भीती काढली आणि योग्य ती माहिती दिली व त्यांनी तात्काळ डुरक्या घोणस या जातीच्या सापाला सुरक्षितरीत्या पकडून नकाने तलाव वनक्षेत्र अधिवासात सुखरूप सोडण्यात आले त्या साठी आकाश सोनवणे यांचा स्थानिक नागरिकांनी आभार मानले.

# पत्रकार रवींद्र तहकीक यांच्या अटकेचा निषेध

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** पत्रकार रवींद्र तहकीक यांच्या अटकेचा खुलताबाद तालुका मराठी पत्रकार संघाच्या वतीने तहसीलदार यांना निवेदन देऊन जाहीर निषेध करण्यात आला. निवेदनात म्हटले आहे की दैनिक लोकपत्रचे संपादक रवींद्र तहकीक यांना अटक करून लोकशाहीची मुस्कटदाबी करण्याचा घटनेचा जाहीर निषेध करत असल्याचे पत्रकार संघाच्या वतीने प्रसिद्धी पत्रकात नमूद केले आहे. श्री रवींद्र तहकिक हे शासनाच्या धोरण विरोधात सडेतोड भूमिका घेऊन लिखाण केल्याबद्दल त्यांना जाणीवपूर्वक अटक करून लोकशाही स्वातंत्र्याची गळचेपी करून अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर घाला घालण्याचा प्रयत्न केला जात आहे. यामुळे लोकशाहीचा चौथा स्तंभ असलेले वृत्तपत्र यांना स्पष्टपणे निर्भीडपणे लिखाण व अभिव्यक्ती स्वातंत्र्य करण्यावर रोख लावण्याच्या उद्देशाने अटक करण्याचे षडयंत्र वापरून लोकशाहीची मुस्कटदाबी केली जात असल्याचे सर्व खुलताबाद तालुका मराठी पत्रकार संघाच्या वतीने निषेध करत असल्याचे सांगितले. या निवेदनावर पत्रकार सुनील घोडके, धनाजी नागे,विजय चौधरी, किशोर पुसे, धनाजी नागे, इसाक कुरेशी, चांद खा पठाण, अण्णा जाधव यांच्यासह पत्रकारांची उपस्थिती होती.





# शारदा मंडळांत ऊर्मिलाताईंचा वाढदिवस साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :**उदयोजिका तथा समाजसेवीका उर्मिलाताई पवार यांचा वाढदिवसा निमित्त शहरातील ग्रामीण रूग्नालयात रूगांना फळ पाटप करण्यात आले. तसेच सध्या नवरात्र शारदा उत्सव सुरू असल्याने शहरातील शारदा मंडळातील महीलांनी उर्मिलाताईचा मोठया थाटात वाढदिवस साजरा केला. यावेळी उदयोजक मनोज पवार, वैद्यकिय अधिकारी डॉ.प्रविण पवार, विजय शिरसाठ, माजी नगरसेवक भरत जाधव, गोकुळ राठोड ,मनोज देशमुख, आकाश बोलधने, पवन ठाकूर, संदीप नरवडे,केतन त्रिभुवन, नौशाद पटेल, इत्यांदीची उपस्थीती होती.

# सर्वेक्षणात आढळली १२१ शाळाबाह्य मुले

आधुनिक केसरी न्यूज

**ठाणे :** शाळाबाह्य मुले शिक्षणाच्या प्रवाहात यावीत आणि त्यांना चांगले शिक्षण मिळावे, या उद्देशातून ठाणे महापालिका शिक्षण विभागाने नुकतीच एक मोहीम राबविली. यामध्ये शहराच्या विविध भागांत पथकांमार्फत करण्यात आलेल्या सर्वेक्षणात १२१ शाळाबाह्य मुले आढळून आली आहेत. त्यापैकी ५५ मुले शाळेत कधीच गेलेली नाहीत तर, उर्वरित ६६ मुले अनियमितपणे शाळेत जात असल्याची बाब समोर आली आहे. या सर्व मुलांना शाळेत प्रवेश देऊन शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यात आले आहे.

# अज्ञात वाहनाच्या धडकेत अभियंता ठार

आधुनिक केसरी न्यूज

**गडचिरोली :** चंद्रपूर येथील महाकालीचे दर्शन घेऊन दुचाकीने परत गावाकडे निघालेल्या पती – पत्नीला अज्ञात वाहनाने धडक दिल्याने अभियंता असलेल्या पतीचा जागीच मृत्यू तर पत्नी गंभीर जखमी झाली. १९ ऑक्टोबरला रात्री आष्टी-चंद्रपूर मार्गावर हा अपघात घडला. प्रमोद देवराव जयपूरकर (२७,रा.आष्टी ता.चामोर्शी) असे मृताचे नाव असून पत्नी प्रणाली प्रमोद जयपूरकर (२३) जखमी आहेत.प्रमोद हे गडचिरोलीत प्रधानमंत्री ग्रामसडक योजना विभागात स्थापत्य अभियंता होते. पत्नी प्रणालीसमवेत ते चंद्रपूर येथे महाकाली देवीच्या दर्शनाला दुचाकीने (एमएच ३३ यू- ३६०८) गेले होते. दर्शन घेतल्यावर परतताना उशीर झाला. रात्री साडेनऊ वाजता चंद्रपूरच्या सावलीजवळ त्यांच्या दुचाकीला अज्ञात वाहनाने धडक दिली. त्यानंतर वाहन सुसाट निघून गेले. यात प्रमोद जयपूरकर यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाल्याने रक्तस्त्राव होऊन जागीच ठार झाले. पत्नी प्रणाली यांच्या पायाला गंभीर दुखापत झाली. त्यांच्यावर नागपूर येथे उपचार सुरु आहेत. प्रमोद यांचा तेलंगणातील प्रणालीशी मार्च २०२३ मध्ये विवाह झाला होता. लग्नाला अवघे सात महिने झाले होते. दोघांनी सुखी संसाराची स्वप्ने पाहिली होती. त्यामुळे प्रणाली यांच्यावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

# दहशतवाद व बॉम्बशोधक पथकाची दुर्गा महोत्सवाला भेट

आधुनिक केसरी न्यूज

**चारठाणा :** सध्या सर्वत्र ठिकाणी दुर्गा महोत्सवाला दि.१५रविवार ते दि.२४ मंगळवार रोजी पर्यत दुर्गा महोत्सवानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रम आयोजित करण्यात येत असून या कार्यक्रमांच्या ठिकाणी अज्ञात व्यक्तींनी काही विघ्नसंतोषी साहीत्य आणुन ठेवली तर काय करायचे,आपल्या परीसरात आनोळखी व्यक्ती आढळून आल्यास तसेच एखाद्या ठिकाणी अज्ञात वस्तू दिसल्यानंतर चारठाणा पोलीस ठाण्यात किंवा परभणी पोलीसांना माहीती द्यावेत ही या मंडळासह गावातील नागरिकांनाही माहीती व्हावीत यासाठी खबरदारीचा भाग म्हणून परभणी येथील बॉम्ब शोधक पथक दहशतवादी व आतंकवादी विरोधी पथकाच्या व श्वान पथकाच्या सिता वाघमारे यांनी असे प्रतिपादन केले की आपल्याला आढळून आल्यास पोलिसांशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले.यावेळी श्वान रियो,पोलीस नाईक प्रदिप साबळे,अशोक कांबळे,संतोष मांडे,विजेद्र चौरे,मोहम्मद आबुझर, चारठाणा पोलीस ठाण्याचे गुप्तचर विभाग प्रमुख यू. एस. बारहाते यांच्यासह आदीं पोलीस कर्मचाऱ्यांसह येथील परिसरातील रेणुका माता मंदिर, श्री जागृत जगदंबा देवी मंदिर संस्थान यांसह दुर्गा महोत्सवातील अष्टभूजा दुर्गा महोत्सव( पेठ विभाग संत सावता महाराज मंदिर संस्थान ),निळकंठ स्वामी दुर्गा मंडळ( पेठ विभाग वाणी गल्ली ) शारदीय नवरात्र महोत्सव मंडळ( मेन रोड ब्राम्हण गल्ली ), नवदुर्गा देवी महोत्सव मेन रोड यांच्यासह आदीं दुर्गा देवी महोत्सव मंडळाची पाहणी करून या सर्व मंदिर व मंडळाना मार्गदर्शन व सुचना दिल्या आहेत यावेळेस या सर्व मंडळाचे मीनाताई नानासाहेब राऊत, राधा राऊत, लता मुंजे, सारिका जोशी, आरती पातरफळे, भागू पांचाळ, संगीता मुळे, राणी



मेटकर, मोहीनी आवचार, पुनम तमशेटे,त्रिवीणी खके, जाधव, सिंधुबाई क्षिरसागर, ईंदुबाई क्षिरसागर, सत्यभामा क्षिरसागर, अनुसया क्षिरसागर, रस्सकला क्षिरसागर, मंगल लिगाडे, पुनम तमशेटे, ज्योती तमशेटे, वदंना तमशेटे, गंगाबाई खके, तमशेटे, अश्वीनी राऊत, अर्चना राऊत, आर्चना देशपांडे, जोशी, सावित्री थोरात, साधना देशपांडे, संजिवनी देशपांडे, सिमा देशपांडे यांच्यासह सर्व दुर्गा महोत्सव मंडळाचे सदस्यासह महिला उपस्थित होत्या.

# दत्तनगर येथील सौंदर्यीकरणाला आयुक्तांची भेट

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** दरवर्षी महानगर पालिका चंद्रपूरचा वतीने पर्यावरण पूरक गणेश मंडळ स्पर्धा आयोजित केली जाते. त्या अनुषंगाने मागील तीन वर्षा पासून श्री नवयुक बाल गणेश मंडळ, दत्त नगर, नागपूर रोड, चंद्रपूर या स्पर्धेत प्रथम क्रमांक घेत आलेला आहे. या वर्षी सुद्धा महानगर पालिकेच्या वतीने गणेश मंडळ साठी होत असलेल्या स्पर्धेत भाग घेतला असून त्याचाच एक भाग म्हणून दत्त नगर, नागपूर रोड, चंद्रपूर येथे टाकावू पासून टिकवू व सौंदरिकरन करणे हा सुध्दा स्पर्धेचा एक भाग होता.

या साठी गणेश मंडळने दत्तनगर येथील घराचा भिंती रंगवून विविध सामाजिक संदेश दिले, तसेच टाकावू वस्तू पासून जसे टायर पासून मच्छी, सूर्य, झेब्रा, टेबल अशा वस्तू तयार केल्या त्या सोबतच लाकडापासून ढोलकी, माणूस तसेच पाणी पडणारा धबधबा, कारंजा , वाघाची गृहा, अस्वलाची गृहा, पक्षासाठी घरटे, पाण्याची सुविधा अशा विविध गोष्टी तयार करण्यात आल्या या सर्व गोष्टींची पाहणी करण्यासाठी चंद्रपूर महानगर पालिकेचे मा. आयुक्त विपीनजी पालीवाल यांनी भेट दिली व या सर्व बाबीची माहिती जाणून घेवून मंडळ सदस्याचे कौतुक केले. हा सुंदर असा परिसर पाहण्यासाठी परिसरातील नागरिक मोठ्या प्रमाणत येवून मंडळ कार्यकर्त्यांचे अभिनंदन करत आहे.





# देशी दारू विक्री करणाऱ्या आरोपीस अटक

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** बहुलखेडा येथे विना परवाना बाहेरून गावटी दारु व देशी दारू विक्री करण्याच्या उद्देशाने मोटरसायकल वरुन जात असताना चौकशी केली असता दारु आढळून आली असता आरोपीस अटक करण्यात आली आहे.

दि. १९/१०/२०२३ रोजी सहा वाजता पोलीस ठाणे सोयगाव हद्दीत अवैध धंद्याची माहिती काढुन केसेस करणे कामी सपोनि.अनमोल केदार, पो.ना बरडे, पो.कों.कोळी, पो.कों दांडगे, पो.कॉ.सिंगल, पो.कों.तायडे असे शासकीय वाहनाने रवाना झाले असता आम्ही रामपुरवाडी गावाच्या जवळ असतांना पो.कौं. तायडे यांना त्यांचे गुप्तबातमीदारामार्फत माहिती मिळाली की, सिंदाड येथुन एक इसम देशी दारु व गावठी हातभट्टीची दारू विना परवाना बेकायदेशीररित्या चोरटी वाहतूक करुन विक्री करण्याच्या उद्देशाने बहुलखेडा गावात मोटार साईकलने विक्री करण्यासाठी घेवुन जात आहे. अशी खात्रीलायक माहिती मिळाल्याने दोन पंचांना बोलावुन त्यांचे सोबत मिळालेल्या माहितीच्या ठिकाणी सहा वाजता बहुलखेड गावाच्या पुढे निंबाचे झाडा जवळ सदरची मोटार सायकलचा पाठलाग करुन त्यास पो.शि. यांनी जागीच पकडुन त्याची मोटार सायकची झडती घेतली असता त्यात एका पांढऱ्या रंगच्या ५० लिटर शमता असलेल्या कॅन मध्ये ५० लिटर गावठी हात भट्टीची दारु अंबट उग्रट वास येणारी किंमत अंदाजे १००००/- रु. च मोटार सायकलच्या डाव्या बाजुला बाधलेल्या हिरव्या रंगाच्या गोणी मध्ये देशी दारु सखु संत्रा टॅंगो प्रिमियमच्या ९० एम. एल. च्या प्लास्टीकच्या ८० सिलबंद बाटल्या किमंत अंदाजे ४०००/-रु. व एक हिरो कंपणीची एच.एफ. डिलक्स मोटार सायकल किमंत अंदाजे ५००००/- रु. असा एकुण ६४०००/- रुपयेचा मुद्देमाल जप्त करुन करण्यात आला व त्यांचेविरुध्द पोलीस ठाणे सोयगाव येथे महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ६५ (ई), ६५(फ) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. सदर गुन्ह्याचा पुढील तपास सपोनि अनमोल केदार यांच्या मार्गदर्शनाखाली पो.ना.बरडे हे करीत आहेत.यामुळे मात्र आता सोयगाव परिसरात गावटी दारु विकणाऱ्या धाबे चांगलेच दणाणले आहेत.

# आर्थिक, सामाजिक धोरण येसगाव येथे अभ्यास टीम

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** खुलताबाद तालुक्यातील मौजे येसगाव नं दोन येथे एमजीएम विद्यापीठ ची एक टीम ग्रामीण भागात आर्थिक व सामाजिक धोरण याचे अभ्यास साठी आली त्यांना पदाधिकाऱ्यांनी चांगला प्रतिसाद दिला. आज ग्रामपंचायत येसगाव नं 2 येथे एमजीएम विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर येथील अर्थशास्त्र विभागातील टीम ग्रामीण भागातील आर्थिक व सामाजिक धोरणांवर अभ्यास करण्यासाठी आली असता त्याप्रसंगी सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, सोसायटी संचालक ,ग्रामसेवक, तलाठी, कृषी सहाय्यक, ग्रामपंचायत कर्मचारी, रोजगार सेवक व गावकरी उपस्थित होते त्यांनी विचारलेल्या वेगवेगळ्या प्रश्नाचे सरपंच, उपसरपंच, ग्रामसेवक, तलाठी, कृषी सहाय्यक यांनी योग्य उत्तर देऊन त्यांचे समाधान केले. आभार प्रदर्शन अर्थशास्त्र विभागातील प्रमुख सराटे सर यांनी केले.

# रेल्वे प्रवाशांवर 'विशेष' भाड्याचा भुर्दंड

आधुनिक केसरी न्यूज

**अकोला :** सणासुदीच्या काळात रेल्वे गाड्यांमधील गर्दी लक्षात घेता विशेष गाड्या चालविण्याचा निर्णय रेल्वे प्रशासनाने घेतला आहे. या विशेष गाड्यांच्या तिकिटाचे भाडे देखील नियमित गाड्यांच्या तुलनेत जास्त राहणार असल्याचे प्रवाशांवर आर्थिक भुर्दंड बसत आहे. प्रवाशांना तिकिटासाठी अतिरिक्त पैसे मोजावे लागत आहेत.

सणासुदीचा काळ म्हटला की प्रत्येकाला आपल्या घराची ओढ लागते. शिक्षण व नोकरीच्या निमित्ताने बाहेरगावी राहणारे दिवाळी कुटुंबीयांसह साजरी करण्यासाठी आपले गाव गाठतात. त्यामुळे दिवाळीच्या काळात रेल्वे गाड्यांमध्ये प्रचंड गर्दी असते. दिवाळीचे आरक्षण साधारणतः तीन महिन्यांपूर्वीच फुल्ल होऊन जाते. रेल्वे गाड्यांमधील गर्दी लक्षात घेता विशेष गाड्या चालविण्याचे नियोजन रेल्वे प्रशासनाकडून केले जाते. यंदा दिवाळी, छट सणांसाठी मध्य रेल्वे एकूण ३३४ विशेष गाड्या चालवणार आहेत. यातील सहा रेल्वेच्या एकूण १३२ फेऱ्या ऑक्टोबर ते डिसेंबरदरम्यान अकोला मार्ग होत आहेत. ०११३९/४० नागपूर-मडगाव द्विसाप्ताहिक ही रेल्वे गाडी मागच्या वर्षीपासून विशेषच्या नावावर चालवली जात आहे.




# मोटरसायकल चोरी; सराईत चोरटे गुन्हे शाखेच्या जाळ्यात

## नऊ मोटरसायकलीसहित आरोपी ताब्यात पोलीस कर्मचाऱ्यांना दहा हजारांचे बक्षीस

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** तक्रारदार विद्र रमेश शिपी यांनी तक्रार दिली की, दि. २५ सप्टेंबर रोजी रात्री ०८.३० ते ०९.१५ वाजेच्या दरम्यान मोठा पुलाजवळ असलेल्या उतरती जवळ नारायणदास बुवा समाधी मंदीराच्या समोर उभी असलेली मोटर सायकल कोणीतरी अज्ञात चोरट्याने त्यांच्या संमतीशिवाय चोरून नेली होती त्याबाबत धुळे शहर पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल आहे. धुळे शहराती मोटर सायकल चोरीचे गांभीर्य पाहून मा. पोलीस अधीक्षक, धुळे यांनी पो. निरी. हेमंत पाटील, स्थागुशा धुळे यांना चोरीच्या गुन्हयाची उकल होणे बाबत सूचना देवून आदेशीत केले होते. त्याअनुषंगाने माहिती प्राप्त करीत असतांना पो. निरी. हेमंत पाटील, यांना गुप्त बातमीदारा मार्फत बातमी मिळाली की, सदरचा गुन्हा हा दौलत किसन चव्हाण रा. छत्रपती शिवाजी नगर, वडजाई ता. जि. धुळे याने केला असून त्याचे राहते घरी चोरीच्या मोटर सायकली असल्याची खात्रीशीर माहिती मिळाल्याने स्थानिक गुन्हे शाखेचे अधिकारी व अंमलदार यांनी दौलत चव्हाण याचे राहते घरी जावून त्यास ताब्यात घेवून चौकशी केली असता, त्याने त्याचे राहते घराजवळून एकुण ५ मोटरसायकल काढुन दिल्या. त्याची खात्री केली असता त्याबाबत इतर गुन्हे उघड आले आहेत.

दाखल गुन्हयाची माहिती प्राप्त करीत आहोत मिळून आलेल्या मोटार सायकली दौलत चव्हाण यांचे ताब्यातून जप्त करुन त्यास पुन्हा विश्वासात घेवून अधिकची विचारपूस केली असता, त्याने त्याचा मित्र नाम पंकज सुभाष नलावडे रा. राजगुरुनगर, धुळे याचे राहते घरी चोरीच्या मोटार सायकली आहे बाबत सांगितले. त्याअनुषंगाने पथकाने तात्काळ पंकज नलावडे याचे घरी जावून खात्री केली असता तो मिळुन आला नाही परंतु त्याचे राहते घराजवळ एकुण ४ मोटर सायकल मिळून आल्या, त्याची खात्री केली असता त्याबाबत दाखल गुन्हे उघडकीस आले आहेत. असा एकूण ३,५०,०००/- रु.कि.चा मोटर सायकली आरोपीतांकडून जप्त



करण्यात आल्या असुन धुळे शहरातील चोरीच्या मोटार सायकलीचे एकुण ६ दाखल गुन्हे उघडकीस आलेले असून इतर ३ दाखलगुन्हयाची माहिती प्राप्त करणे सुरु आहे.

सदरची कारवाई संजय बारकुंड, पोलीस अधीक्षक, धुळे श्री. किशोर काळे, अपर पोलीस अधीक्षक, धुळे यांचे मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक श्री. हेमंत पाटील, स्था.गु.शा. धुळे, पोसईबाळासाहेब सूर्यवंशी, पोसई अमरजित मोरे, असई, संजय पाटील, पोहेकॉ संदीप सरग, हेमंत बोरसे, योगेश चव्हाण, संदीप पाटील, प्रकाश सोनार, प्रल्हाद वाघ, तुषार सूर्यवंशी अशांनी केली आहे.

# वाघाच्या हल्ल्यात गुराखी ठार

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** जंगलात गुरे चराईसाठी गेलेल्या बंडू विठ्ठल भेंडारे (६०) या गुराख्यावर दबा धरुन बसलेल्या वाघाने हल्ला केला. यात तो जागीच ठार झाला. ही घटना वनविकास महामंडळाच्या कांतापेठ बिटातील कक्ष क्रं. ५२३ मध्ये घडली.

मूल तालुक्यातील मौजा कांतापेठ येथील भेंडारे हे गुरांना चराईसाठी जंगलात घेऊन गेले होते. दुपारच्या सुमारास जंगलाकडून गुरे धावत येत असल्याने कांतापेठ येथील नागरिकांना संशय आला. ते जंगलाच्या दिशेने गेले असता भेंडारे यांना वाघाने हल्ला करून ठार केल्याची घटना उघडकीस आली. या घटनेने परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे.

# बहुजन समाज पार्टीतर्फे आरक्षण हक्क परिषद

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** बहुजन समाज पार्टीच्या धुळे शहर आणि धुळे ग्रामीण विधानसभेच्या वतीने एससी, एसटी, ओबीसी आरक्षण हक्क परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. धुळे शहरात गरूड वाचनालय येथे 23 ऑक्टोबरला दुपारी 12 वाजता परिषदेला सुरूवात होईल.

बहुजन समाज पार्टी महाराष्ट्र प्रदेशच्या वतीने संपूर्ण महाराष्ट्रभर एससी, एसटी, ओबीसी आरक्षण हक्क परिषद आयोजित करण्यात आल्या आहेत. त्याचाच एक भाग म्हणून धुळ्यात परिषद होत आहे.

बसपाचे राष्ट्रीय महासचिव तथा राज्याचे प्रभारी माजी खासदार डॉ. अशोक सिद्धार्थ, प्रदेशाध्यक्ष ॲड. संदीप ताजने, राज्याचे नेते रवींद्र गवई, प्रदेश महासचिव रमेश निकम, जिल्हाध्यक्ष आनंद सैंदाणे, जिल्हा प्रभारी मिलिंद बैसाणे, प्रा. रमेश अहिरे, गोविंद कांबळे, प्रदीप शिरसाठ, संतोष मोरे, विजय भामरे, विजयराव मोरे, संगम बागुल यांची प्रमुख उपस्थिती असेल.

आरक्षण हक्क परिषद घेण्याचा मुख्य उद्देश हा आहे की, दलित, आदिवासी, ओबीसी समाजाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय संविधानात हक्क, अधिकार बहाल केले आहेत. आपल्या संविधानिक अधिकारांची आणि संविधानाची जाण करून देण्यासाठी ही परिषद भरविण्यात आली आहे.

परिषदेला उपस्थित राहण्याचे आवाहन धुळे विधानसभा प्रभारी सुनील बैसाणे, प्रकाश दाभाडे, ॲड. सतिष अहिरे, आकाश सोनार, ॲड. कृष्णा निमगडे, ॲड. संदिप जावरे, ॲड. मिलिंद बाविस्कर, रमेश बैसाणे, ईश्वर जाधव, अकबर पिंजारी, सुपडू मोरे, राकेश खैरनार, सागर भामरे, दादाजी साळवे, ईश्वर साळवे, देवेंद्र जाधव, गौतम मोरे, नाना साळवे, प्रशिक भामरे आदींनी केले आहे.



# प्रमोद महाजन ग्रामीण कौशल्य विकास केंद्राचे (व्हर्चुअल) उद्घाटन

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** तालुक्यातील गणोरी येथे दि. १९ ऑक्टो रोजी युवा राजुरेश्वर गणेश बहुद्देशीय संस्था व महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी अंतर्गत प्रमोद महाजन ग्रामीण कौशल्य विकास केंद्राचे (व्हर्चुअल ) उद्घाटन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते मोठ्या उत्साहात पार पडले. यावेळी मुख्यमंत्री श्री एकनाथजी शिंदे, उपमुख्यमंत्री श्री देवेंद्र फडणवीस जी, उपमुख्यमंत्री श्री अजित पवार जी, कौशल्य विकास मंत्री श्री मंगल प्रभात लोढा जी यांच्या प्रमुख उपस्थितीत पर पडला. यावेळी पंतप्रधान मोदींनी कौशल्य विकासाचे महत्व नमूद करत भारत जगाचे नेतृत्व करत असून आपण कौशल्य विकासाचे केंद्र बनावे यासाठी अशा कोर्सेसची आवश्यकता असल्याचे सांगितले. याप्रसंगी उपस्थित गणोरीच्या सरपंच सरलाताई संतोष तांदळे, उपसरपंच राजेन्द्र तांदळे, सीमाताई उबाळे, संतोष तांदळे, बाळासाहेब तांदळे,रविंद्र गायकवाड, बाळू तांदळे, कृष्णा भादवे कैलास गायकवाड, परमेश्वर काळे दामु उबाळे रावसाहेब जाधव, दादासाहेब जाधव, जाधव सर, प्रकल्प संचालक कविता अमृतकर श्री राजुरेश्वर गणेश बहुउद्देशीय संस्था, आदित्य सोनवणे, तेजस्विनी भुतकर, दिपाली मगरे, नितु राजभर, अभिजित साळवे, प्रियांका गोरे, आयटीआयचे विद्यार्थी, विविध शाळेचे विध्यार्थी यांच्यासह एक हजार नागरिकांची उपस्थिती होती. सर्व जाती धर्मातील अठरा वर्षांवरील मुला, मुलांनी ग्राफिक डिझाईनर व डेअरी फार्मर या दोन मोफत कौशल्य विकास कोर्सच्या प्रशिक्षणाचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले.

# गर्भलिंग निदान कायद्याचे उल्लंघन प्रकरणी डॉक्टरला एक वर्ष कारावास व दहा हजार दंड

आधुनिक केसरी न्यूज

**धाराशिव :** गर्भधारणा पूर्व व प्रसूतीपूर्व गर्भलिंग निवडीस प्रतिबंधक कायदा अंमलात असूनही काही ठिकाणी कायद्याचे उल्लंघन केल्याचे दिसून येत आहे. जिल्हा सल्लागार समिती व पीसीपीएनडीटी दक्षता समिती सतत तत्पर असून कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्ती विरुद्ध कारवाई केली जाते. अशीच कारवाई 2014 मध्ये करण्यात आली होती. विभागीय दक्षता पथकामार्फत धाराशिव, जिल्ह्यात धडक मोहीम अंतर्गत तपासणी करण्यात आली, तपासणीमध्ये दोषी विरुद्ध कारवाई करण्यात आली होती. त्यामध्ये धाराशिव येथील एका डॉक्टरानी पी.सी.पी.एन. डी.टी. कायद्याचे उल्लंघन केल्याचे दिसून आले. त्या अनुषंगाने जिल्ह्यातील तत्कालीन जिल्हा शल्य चिकित्सक यांनी दिलेल्या अधिकार पत्रानुसार प्रकरण दाखल करण्यात आले होते. या प्रकरणातील आरोपी डॉक्टर यांना मुख्य न्याय दंडाधिकारी एम. एस.भदाणे यांनी एक वर्ष कारावास व दहा हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावण्यात आली आहे. या प्रकरणांमध्ये सरकार पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता व्ही.एस शेवाळकर यांनी कामकाज पाहिले तर त्यांना पीसीपीएनडीटी विधी सल्लागार एडवोकेट रेणुका शेटे यांचे सहकार्य लाभले.

अवैद्यरित्या गर्भलिंग निदान तसेच अवैधरित्या गर्भपात करणाऱ्यांची माहिती द्या व एक लाख रुपये मिळवा

धाराशिव जिल्ह्याचे लिंग गुणोत्तर प्रमाण दिवसेंदिवस कमी होत चालले आहे हि अत्यंत गंभीर बाब आहे. अवैधरित्या गर्भलिंग निदान करणाऱ्याची माहिती देणाऱ्या व्यक्तीस राज्य शासनाकडून खबरी योजनेअंतर्गत एक लाख रुपये बक्षीस देण्यात येते.माहिती देणाऱ्याचे नाव गोपनीय ठेवण्यात येते. ही माहिती कळवण्यासाठी हेल्पलाइन क्रमांक 18002334475 या क्रमांकावर संपर्क साधावा अथवा नजदीकच्या ग्रामीण, उपजिल्ह,जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालय धाराशिव येथे संपर्क साधावा. नागरिकांनी माहिती देण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन जिल्हा शल्य चिकित्सक यांनी केले आहे.

# भा.ज.पा. सोशल मीडिया तालुकाध्यक्षपदी समाधान पाटील नवले यांची निवड

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** तालुक्यातील लिहा येथील जहागीर तालुका फुलंब्री येथील श्री समाधान पाटील नवले यांची भारतीय जनता पक्षाच्या सोशल मीडिया फुलंब्री तालुकाध्यक्ष पदी नियुक्ती करण्यात आली. केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री श्री रावसाहेब दानवे तसेच माजी विधानसभा अध्यक्ष तथा फुलंब्री मतदारसंघाचे आमदार श्री हरिभाऊ बागडे नाना यांच्या आशिर्वादाने तसेच जिल्हाध्यक्ष सुहास भाऊ सिरसाठ यांच्या मान्यतेने तालुका अध्यक्ष श्री सांडु पाटील जाधव यांनी ही नियुक्ती जाहीर केली.



मुळचे संघ स्वयंसेवक असलेल्या समाधान नवले पाटील यांनी आतापर्यंत युवा मोर्चा तालुका चिटणीस, भाजपा तालुका चिटणीस आदी पदाच्या माध्यमातून पक्षाचे काम केले असून त्यांच्या या निवडीबद्दल सर्व स्थरातुन अभिनंदन होत आहे.




**सध्या सर्वत्र नवरात्रीची धूम चालली आहे, हा आठवडा म्हणजे महाराष्ट्रातील राणारागिनिंसाठी मोठ्ठा उत्सवाचं वातावरण दररोज वेगळा रंग आणि त्यापमाणे महिलांचा पेहराव असाच जी आय वन हॉस्पिटलच्या महिला स्टाफने पिवळ्या रंगाच्या साड्यात सर्वांना आकर्षित केले.**

# सरदार पटेल महाविद्यालयात तृतीय पदवी वितरण समारंभ

## अपयश ही यशाची पहिली पायरी : कुलगुरू डॉ. प्रशांत बोकारे

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** अब्राहम लिंकन हे सुरुवातीस अनेक वेळा निवडणुकीत पराभूत झाले. पण पराभव आणि अपयश स्वीकारण्याची अनेक उदाहरणे त्यांच्याकडे होती. त्यांनी हार मानली नाही आणि आपल्या कल्पकतेने आणि चिकाटीने ते महाशक्तीशाली अमेरिका देशाचे महान राष्ट्रपती बनले असे सांगत अपयश ही यशाची पहिली पायरी असल्याचे प्रतिपादन गोंडवाना विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रशांत बोकारे यांनी येथे बोलताना केले.
येथील सरदार पटेल महाविद्यालयातील स्व. शांताराम पोटदुखे सभागृहात आयोजित तृतीय पदवी वितरण समारंभ व गुणवंत गौरव सोहळ्यात ते बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सर्वोदय शिक्षण मंडळाच्या अध्यक्ष सुधाताई शांताराम पोटदुखे या होत्या. यावेळी सर्वोदय शिक्षण मंडळाचे उपाध्यक्ष सुदर्शन निमकर, सहसचिव डॉ. कीर्तीवर्धन दीक्षित, सदस्य जिनेश पटेल, महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष प्राचार्य श्याम धोपटे, प्राचार्य डॉ. पी.एम.काटकर, गोंडवाना विद्यापीठाच्या वाणिज्य विभागाचे अधिष्ठाता प्राचार्य डॉ.जयेश चक्रवर्ती, संजय रामगिरवार, डॉ. स्वप्निल माधमशेट्टीवार हे प्रामुख्याने उपस्थित होते.
सर्वोदय शिक्षण मंडळातर्फे डॉ. कीर्तीवर्धन दीक्षित यांनी यश मिळविणे सोपे, पण टिकविणे कठीण असल्याचे नमूद करीत महाविद्यालयाच्या यशाबद्धल समाधान व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्राचार्य पी. एम. काटकर यांनी महाविद्यालयाने राबविलेल्या विविध उपक्रमांची माहिती देत या यशात महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांसोबतच संस्थेचाही महत्वाचा वाटा असल्याचे नमूद केले केले. माजी विद्यार्थी संघातर्फे प्राचार्य शाम धोपटे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. गोंडवाना विद्यापीठातर्फे उत्कृष्ठ अधिसभा सदस्य म्हणून पुरस्कृत झाल्याबद्दल संजय रामगिरवार यांचा यावेळी मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी गुणवत्ता प्राप्त विद्यार्थिनी माधुरी कटकोजवार हिने आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी ६३ गुणवत्ता यादीत समाविष्ट व सुवर्णपदक प्राप्त विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. स्व.ओंकारनाथ शर्मा शिष्यवृत्ती दोघांना, तर 'परीक्षा पे चर्चा' मध्ये सहभागी चार विद्यार्थ्यांना गौरविण्यात आले. माजी विद्यार्थी संघातर्फे १४ विद्यार्थी तर महाविद्यालयातील प्राध्यापकांद्वारे प्रायोजित ५३ पुरस्कारांचे वितरण करण्यात आले. कार्यक्रमाचे संचालन प्रा. महेंद्र बेताल व प्रा. स्नेहल रायकुंडलिया यांनी, तर आभार प्रदर्शन डॉ. स्वप्निल माधमशेट्टीवार यांनी केले. दरम्यान सर्वोदय शिक्षण मंडळाच्या अध्यक्ष सुधाताई पोटदुखे, कार्याध्यक्ष अरविंद सावकार पोरेड्डीवार, उपाध्यक्ष सुदर्शन निमकर, सर्वोदय शिक्षण मंडळाचे सचिव प्रशांत पोटदुखे, सहसचिव डॉ. किर्तीवर्धन दीक्षित, कोषाध्यक्ष मनोहरराव तारकुंडे, सदस्य सगुणाताई तलांडी, राकेश पटेल, जिनेश पटेल, आ.किशोर जोरगेवार, संदीप गड्डमवार, सुधाकर पोटदुखे, चंद्रशेखर वाडेगावकर यांनी गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन करीत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.





## पिलीव येथील जहागीरदार पार्टीत इनकमिंग सुरूच

आधुनिक केसरी न्यूज

**माळशिरस :** तालुक्यातील पिलीव येथील गावामध्ये भाजप पुरस्कृत म्हणजेच मोहिते-पाटील गटाची जहागीरदार पार्टी एक तर दुसरी राष्ट्रवादी पुरस्कृत जानकर गटाची नागरी आघाडी पार्टी एक अशा दोन पार्ट्या आहेत.सध्या पिलीव ग्रामपंचायत वर जहागीरदार पार्टीचे वर्चस्व आहे. गेल्या काही दिवसांपूर्वीच वार्ड क्रमांक दोनमधील पिलीव गावचे माजी उपसरपंच मोहन करांडे नागरी गाडी पार्टीतून जागीरदार पार्टीत आले आहेत. त्यामुळे नागरी आघाडी पार्टीत एक प्रकारची पोकळी निर्माण झाली होती. यातूनच कसेबसे सावरत असतानाच काल गुरुवार १९ ऑक्टोंबर रोजी वार्ड क्रमांक ३ मधील नागरी आघाडी पार्टीचे माजी ग्रामपंचायत सदस्य सुरेश लोखंडे, समाधान लोखंडे, अशोक लोखंडे, संतोष लोखंडे, विठ्ठल लोखंडे, सचिन विरकर यासह इतर १५ ते २० लोकांनी नागरी आघाडी पार्टीची ध्येय धोरणं पटत नसल्याने जहागीरदार पार्टीचे अध्यक्ष संग्रामसिंह जहागीरदार यांच्या उपस्थितीत जहागीरदार पार्टीमध्ये प्रवेश केला. वार्ड क्रमांक ३ हा नागरी आघाडीचा बालेकिल्ला समजला जातो. परंतु सुरेश लोखंडे यांचे बूड व मताचा गट्टा मोठा असल्याने येणाऱ्या निवडणुकीत नागरी आघाडी पार्टीला वार्ड क्रमांक ३ मध्ये तारेवरची कसरत करावी लागणार असल्याचे जाणकार मंडळीतून बोलले जात आहे.आपल्या पार्टीत प्रवेश केल्याने संग्रामसिंह जहागीरदार यांनी सर्वांचे पुष्पहार, शाल, श्रीपळ देऊन पार्टीमध्ये स्वागत केले. पार्टी प्रवेशाच्या वेळी जहागीरदार पार्टीचे पदाधिकारी कार्यकर्ते व ग्रामस्थ उपस्थित होते.

## दीक्षाभूमीवर महिला धम्म परिषदेचे आयोजन

### दुपारच्या सत्रात विविध विषयांवर विचारमंथन

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** ६७ व्या धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त प.पू.डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती व दीक्षाभूमी महिला धम्म संयोजन समिती नागपूर यांच्या वतीने शनिवार दि.२१ ऑक्टोबर २०२३ रोजी दीक्षाभूमी येथे एक दिवसीय महिला धम्मपरिषदेचे आयोजन करण्यात आलेले असून दुपारच्या सत्रात विविध विषयांवर व्याख्यान संपन्न होणार आहेत. कार्यक्रमाचे उदघाटन सकाळी ९.३० वाजता होणार आहे. अध्यक्षस्थानी माजी लेडी गव्हर्नर डॉ.कमलताई गवई असणार आहेत. उद्घाटक म्हणून माजी शिक्षणमंत्री वर्षाताई गायकवाड ह्या असणार आहेत.
डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती, (दीक्षाभूमी) नागपूरचे अध्यक्ष भंते सुरई ससाई यांची विशेष उपस्थिती असणार आहे. प्रमुख अतिथी म्हणून भिक्खुणी शाक्य धम्मदिना, डॉ.माधवी खोडे-चवरे (IAS,अप्पर आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर), प्रा.डॉ.भुवनेश्वरी मेहेरे (प्राचार्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय,दीक्षाभूमी नागपूर),कीर्ती अर्जुन गवई, रेखाताई खोब्रागडे (आंबेडकरी विचारवंत) आदी असणार आहेत. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक तक्षशिला वागधरे करणार आहेत. प्रा. डॉ.सरोज आगलावे हे भूमिका मांडणार आहेत.डॉ.बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, राष्ट्रीय सेवा योजना संच हे मैत्रीगीत सादर करणार आहेत एकपात्री नाट्यछटा सादरकर्ती म्हणुन डॉ.वीणा राऊत ह्या असणार आहेत.
संचालन डॉ.वीणा राऊत,वंदना जीवने तसेच अतिथींचा परिचय ज्योती आवडे, ममता बोले,ॲड.स्मीता कांबळे व कार्यक्रमाचे आभार कल्पना मेश्राम ह्या करणार आहेत.यावेळी संविधान जागर (संधागार परउंडेशन, नागपूर लेखक एम.एस. दिग्दर्शक डॉ.वीणा राऊत आणि चळवळ (सादरकर्ती पल्लवी जीवनतारे) यांचा सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहे. दुपारच्या सत्रात (२ ते ५) वाजेपर्यंत विविध विषयांवर मार्गदर्शनपर विचारमंथन करणारी व्याख्यान संपन्न होणार आहेत.पी.डब्ल्यू. एस. महाविद्यालयाच्या उपप्राचार्य प्रा.डॉ.प्रज्ञा बागडे ह्या अध्यक्ष स्थान भूषविणार आहेत. मुंबई विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र विभाग प्रमुख प्रा.डॉ. वैशाली बांबोळे ह्या 'प्राब्लेम ऑफ रूपी' या ग्रंथाचे समकालीन संदर्भ व वास्तव या विषयावर संवाद साधणार आहेत.जामिया मिलिया इस्लामिया विद्यापीठाच्या हिंदी विभाग प्रमुख प्रा.डॉ.हेमलता महेश्वर ह्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या धम्मक्रांतीची फलती या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत.पंजाब येथील सामाजिक कार्यकर्त्या जसविंदर कौर ह्या भारतात स्त्रियांच्या अत्याचाराचा कळस मणिपूर या विषयावर वास्तव मांडणार आहेत.आंबेडकरी विचारवंत व सामाजिक कार्यकर्त्या छायाताई खोलगडे ह्या आंदोलनात महिलांच्या भूमिका या विषयावर बोलणार आहेत.
लेखिका व अभ्यासक उज्वला गणवीर ह्या भूमिका मांडणार आहेत.संचालन प्रा. डॉ. सरोज डांगे तसेच परिचय रंजना वासे, माया थोरात, पुष्पा घोडके करून देणार आहेत. आभार उषा बौद्ध करतील. ५.३० ते ६.३० या वेळेत महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध एकांकिका 'गटार' लेखक, दिग्दर्शक विरेंद्र गणवीर प्रस्तुती बहुजन रंगभूमी, नागपूर तसेच एकपात्री नाट्यप्रयोग सादरकर्ती वंदना जीवने यांचा सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहे. सायं. ७ ते ९ या वेळेत निमंत्रितांचे कविसंमेलन : 'काव्यफुले' घेण्यात येणार आहे. अध्यक्षस्थानी जेष्ठ कवी आणि साहित्यिक इ. गो. नारनवरे तर प्रमुख अतिथी सुप्रसिद्ध कवयित्री) सुनिता वानखेडे असणार आहेत.
दीपाली दीप, हृदय चक्रधर, करुणा मून, विशाखा नकाशे, चितरंजन चवरे, संजय गोडघाटे, डॉ.महेन्द्रकुमार मेश्राम, शालिनी मनवर, प्रकाश कांबळे, प्रतिभा सहारे, वंदना जीवने, रंगराज गोस्वामी, ॲड. संघमित्रा बाभळे, माधुरी सेलोकर,पौर्णिमा मेश्राम, सविता धमगाये आदी निमंत्रित कवि सहभागी असणार आहेत.
संचालन सरिता सातारहे तर आभार शीला इंगळे करणार आहेत.
सहआयोजक म्हणून समता सैनिक दल,ऑल इंडिया प्रोग्रेसिव्ह वुमेन ऑर्गनायझेशन, संजीवनी सखी संघ नागपूर,संबोधिनी महिला बहुउद्देशिय विकास संस्था, १९४२ राष्ट्रीय महिला क्रांती परिषद अमृत महोत्सव समिती, राष्ट्रीय पारिवारिक धम्मसंगोष्टी(नागपूर),पारिवारिक धम्म संगोष्टी, बौद्ध महिला मैत्री संघ (नागपूर), अनाथपिंडक सहकारी पतसंस्था (नागपूर), डॉ.बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय (राष्ट्रीय सेवा योजना), बौधी पविखया धम्म फाऊंडेशन, संबुद्ध महिला संघटन (नागपूर), संथागार फाउंडेशन (नागपूर), राष्ट्रीय ओबीसी महिला महासंघ, आम्रपाली महिला मंडळ, जीजाऊ ब्रिगेड (नागपूर), लुंबिनी बहुउद्देशिय महिला संघटन, मैत्रेयी बहुउद्देशिय संस्था आदीं संघटना नियोजन करत आहेत. या महिला धम्म परिषदेला उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आलेले आहे.



## भिवसननगर येथे गावगुंडांचा हैदोस

### रहिवाशांनी पोलीस अधीक्षक यांच्याकडे घेतली धाव

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** स्थानिक नागरिकांनी सांगितले कि परिसरात ९०% रहिवाशी शासकीय नोकरदार, सेवानिवृत कर्मचारी व व्यावसायिक गुण्या गोविंदाने राहत असतात आज पर्यंत कोणत्याही प्रकारचे भांडण व कुरापत झालेली नाही असे असताना उपरोक्त विषयात नमुद केलेला सदर इसम देखील याच परिसरा आठने दहा वर्षापासुन वास्तव्यास आहे. सदर कॉलनीमध्ये रहिवाश्यांनी सार्वजनीक वर्गणी गोळा करून ओपन स्पेस मध्ये श्री साईबाबा मंदिर बगीचा निर्माण केला आहे. सदर मंदिरामध्ये हा इसम स्वतःची खाजगी मालमत्ता समजुन अधिकार गाजवित आहे असा आरोपही या निवेदनात करण्यात आला आहे. कॉलनीवासियांना सतत दमबाजी व दहशत निर्माण करुन मंदिर परिसरात येण्यास मज्जाव करीत असतो. तसेच बाहेरुन त्याचे नातेवाईक व गुंड लोक आणुन दहशत पसरवुन भितीचे वातावरण निर्माण करतो. कॉलनीतील अनेक कुटुंबाना धमक्या देणे मंदिराच्या नावाने पैश्याची मागणी करणे, खंडणी मागणे, ब्लकमेल करणे इ. स्वरुपाचे गंभीर घटना आहेत परंतू त्याच्या दहशतीमुळे तक्रार दाखल करण्यास कोणीही धजावत नाही असे या ठिकाणी सांगण्यात आले. तसेच मध्यस्ती करण्यासाठी गेलेल्या महिला व पुरुषाना शस्त्राचा धाक दाखवुन त्याची पत्नी स्वताः चे कपड़े फाडुन खोटा गुन्हा दाखल करण्याची धमकी देते. ह्या पूर्वी कॉलनीतील लोकांना मारहान केलेली आहे असा आरोप स्थानिक रहिवाशांनी केला आहे. त्यासाठी स्थानिक रहिवाशांनी पोलीस अधीक्षक यांना अशी मागणी करण्यात आली की त्या गाव गुंडाचा त्वरित बंदोबस्त करण्यात यावा कारवाई करण्यात यावी असे या ठिकाणी मागणी करण्यात आली आहे.


हिवराळे क्लिनिक
ॲण्ड हर्बल हेल्थ केअर

9130174444
डॉ. के.बी. हिवराळे
आयुर्वेद जनरल फिजिशियन,
ॲक्युपंक्चर तज्ज्ञ
B.A.M.S., N.D.,C.M.S.& Ed(MUMBAI)
R.No.2366/12/2000
एमसीए/2022/10/बी/000839 बॉम्बे नर्सिंग होम परवाना क्र.218, औरंगाबाद

उपलब्ध सुविधा
- जुनाट सांधे दुखी (गुडघे दुखी)
- आम वात उदर रोग
- दमा व ॲलर्जी (जुनाट)
- चिकन गुनिया
- मनोकयीईक आजार
- त्वचा व गुप्त रोग
- स्त्रीयांचे आजार
- स्थूलपणा, मूळव्याध
- वंध्यत्व, संतती प्राप्ती
- कॅन्सर सल्ला, मुतखडा
- वजन वाढविणे
- वजन कमी करणे
- केसांच्या सर्व तक्रारी
- लहान मुलांची
- स्मरणशक्ती वाढविणे

पंचकर्म सुविधा (मुख्यकार्य) 1) वमन, 2) विरेचन, 3) बस्ती, 4) नस्य, 5) रक्तमोक्षन



अजिंठा रोड, सारा कॉलनी, फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद



# महावितरणच्या गुणवंत, उपक्रमशील कर्मचाऱ्यांचा गौरव

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** कामगार कल्याण मंडळाच्या भजन स्पर्धेत यश मिळवणाऱ्या तसेच विविध उपक्रमांत भाग घेणाऱ्या महावितरणच्या कर्मचाऱ्यांचा गौरव मुख्य अभियंता डॉ.मुरहरी केळे यांच्या हस्ते करण्यात आला.

कामगार कल्याण मंडळाच्या भजन स्पर्धेत छत्रपती संभाजीनगर परिमंडलाच्या संघाने सांघिक उत्तेजनार्थसह वैयक्तिक गायनात प्रथम पारितोषिक पटकावले. या संघात सुधाकर जायभाये, नवनाथ पवार, रमेश शिंदे, दिगंबर रेंगे, लक्ष्मण वाघ, राजेश्वर सूर्यवंशी, महादू कड, वैभव साखरे, अरुण दुबाले, अभय एरंडे, सदानंद जाधव, भानुदास शेवाळे, तबलावादक जीवन पवार यांनी सहभाग घेतला. त्यांचा मुख्य अभियंता डॉ.केळे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. तसेच पर्यावरण रक्षण चळवळीत सक्रीय भाग घेणारे प्रणाली विश्लेषक रोहित ठाकूर आणि 'गो-ग्रीन' योजनेत मोठ्या संख्येने वीज ग्राहकांची नोंदणी करणारे मोंढा नाका शाखेचे सहायक अभियंता जितेंद्र मालुसरे, प्रधान तंत्रज्ञ नारायण खरात यांचाही डॉ.केळे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. मुख्य अभियंता डॉ.मुरहरी केळे यांनी छत्रपती संभाजीनगर परिमंडलात स्थापन करण्यात येणाऱ्या 'क्वालिटी सर्कल'च्या माध्यमातून उपक्रमशील कर्मचाऱ्यांच्या नवनवीन संकल्पनांचा उपयोग ग्राहक सुविधा, दैनंदिन कामकाज अधिक चांगल्या प्रकारे करण्यासाठी केला जाईल, असे सांगितले. यावेळी सहायक महाव्यवस्थापक (प्र) स्वाती चव्हाण-गाडेकर, उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी विश्वास पाटील, कार्यकारी अभियंता दीपक सोनोने, शैलेश कलंत्री, प्रणाली विश्लेषक प्रकाश चांडगे, अनुदेशक दिलीप पवार उपस्थित होते.



## प्रमोद महाजन ग्रामीण कौशल्य विकास केंद्र अंतर्गत कौशल्य केंद्राचे उद्घाटन

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** तालुक्यातील वडोद बाजार येथे  प्रमोद महाजन ग्रामीण कौशल्य विकास केंद्र अंतर्गत वडोद बाजार येथील केंद्राचे उद्घाटन करण्यात आले यावेळी आमदार हरिभाऊ बागडे, उपजिल्हाधिकारी, तहसिलदार कानगुले,कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती अनुराधा चव्हाण जिल्हाध्यक्ष सुहास शिरसाट शिरसाट, विजय औताडे, भाजपा तालुका अध्यक्ष सांडू अण्णा जाधव, बाजार समितीचे संचालक सर्जेराव मेटे, महिला तालुका अध्यक्ष ऐश्वर्या गाडेकर सरपंच पाकीजा पठाण,उपसरपंच गोपाळ वाघ गोपाळ वाघ ग्रामपंचायत सदस्य शिवराम मस्के, ग्रामपंचायत सदस्य शुभम गंगावणे काकाजी कोलते, आदीसह ग्रामस्थ उपस्थित होते. वेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते ऑनलाईन उद्घाटन करण्यात आले. यावेळी ग्रामीण विकास कोषल्य मंत्री मंगल प्रभात लोढा, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थित ऑनलाईन प्रमोद महाजन ग्रामीण कौशल्य विकास केंद्र चे वडोद बाजार येथील केंद्राचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी  आमदार हरिभाऊ बागडे, उपजिल्हाधिकारी, तहसिलदार कानगुले, कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती अनुराधा चव्हाण जिल्हाध्यक्ष सुहास शिरसाट शिरसाट, विजय औताडे, सांडू अण्णा जाधव,  बाजार समितीचे संचालक सर्जेराव मेटे, महिला तालुका अध्यक्ष ऐश्वर्या गाडेकर सरपंच पाकीजा पठाण, उपसरपंच गोपाळ वाघ, चेअरमन कडूबा म्हस्के, सदस्य शिवराम मस्के, ग्रामपंचायत सदस्य शुभम गंगावणे काकाजी कोलते आदींसह ग्रामस्थ उपस्थित होते.

## आ.सतीश चव्हाण यांच्या हस्ते म्हैसमाळ येथे विविध विकास कामांचे लोकार्पण

आधुनिक केसरी न्यूज



**खुलताबाद :** तालुक्यातील म्हैसमाळ येथे येणाऱ्या भाविकांसाठी आमदार सतीश चव्हाण यांनी पर्यटन विकास योजनेच्या माध्यमातून 40 लक्ष रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला होता. सदरील ठिकाणचे कामे पूर्ण झाली असून आज या विकास कामांचे लोकार्पण आमदार सतीश चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आले. महाविकास आघाडी सरकारच्या कार्यकाळात सतीश चव्हाण यांनी शासनस्तरावर पाठपुरावा करून पर्यटन विकास योजना सन 2021-22 अंतर्गत मराठवाड्याचे महाबळेश्वर म्हणून ओळख असलेल्या म्हैसमाळ येथे गिरीजादेवी मंदिराचे सुशोभीकरण करण्यासाठी 10 लक्ष, स्वयंपाक घराचे शेड बांधकाम करण्यासाठी 10 लक्ष, येळगंगा नदीवर घाट बांधकाम करण्यासाठी 10 लक्ष, भाविकांच्या वाहनांसाठी वाहनतळ उभारण्यासाठी 10 लक्ष असा 40 लक्ष रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला होता. 17 मे 2022 रोजी राज्याच्या तत्कालीन पर्यटन राज्यमंत्री ना.आदिती तटकरे यांच्या हस्ते सदरील विकास कामांचे भूमिपूजन करण्यात आले होते. सदरील सर्व विकासकामे पूर्ण झाली असून आज या विकास कामांचे लोकार्पण आ.सतीश चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आले. यापुढे देखील तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठी आपण प्रयत्नशील राहू अशी ग्वाही  यावेळी आ.सतीश चव्हाण यांनी दिली. आजमपूर येथील शनी मंदिर ते गल्लेबोरगाव रस्त्यापर्यंत मजबुतीकरण करण्यासाठी आ.सतीश चव्हाण यांनी 25-15 योजनेअंतर्गत 10 लक्ष रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला असून आज सदरील कामाचे भूमिपूजन देखील आ.सतीश चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी माजी सभापती महेश उबाळे, राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष गजानन फुलारे, ज्ञानेश्वर दुधारे, भगवानआबा कामठे, मिठू महालकर, प्रकाश नलावडे, अजिनाथ साळुंके, सचिन गिरी, नवनाथ मालोदे, अशोक मालोदे, संदीप काळे, सुनील काळे, मदन राठोड, ऋषिकेश बोडखे, सुभाष धनेधर, भगवान देवकर, कैलास हरणे, भाऊसाहेब जाधव, केशव जाधव, संदीप काळे, बाबासाहेब माळकर, बबन औटे, भीमराव कडू, अप्पाराव मालोदे, गणेश महेर, विष्णू पुरी आदींची उपस्थिती होती.

गुप्तरोगाबाबत
काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट

महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर